// स्त्रीशक्तिरतुल्या सदा

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

वर्ष : १ अंक : ५

# साद

## दे, साथ घे

जुलै २०१९



## वारी नारीशक्तीची



## राज्यव्यापी ‘प्रज्ज्वला’चा दणदणीत शुभारंभ

## शेतकऱ्यांच्या विधवांसाठी सरकारचे पाऊल...

‘प्रज्वला’साठी पाच कोटी रूपये


**अर्थसंकल्प**


बचतगटांना १ लाखाचे कर्ज

## कायदेविषयक जनजागृतीसाठी
## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची पुस्तकमालिका

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //


# 'विधी'-लिखित




















## महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
'सुहिता' हेल्पलाइन - ७४७७७२२४२४

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

साद
दे, साथ घे

RNI No. MAHMAR49593

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय



## वारीतील वसा

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने यंदाच्या आषाढी वारीत वारी नारीशक्ती हा उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत महिला आयोगाने तयार केलेले चित्ररथ संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात सहभागी झाले. संपूर्ण वारीच्या काळात आयोगाचे कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी सॅनिटरी पॅड वाटप, त्या विषयी जनजागृती, महिलांविषयक कायद्यांची माहिती देणे, प्रबोधनपर चित्रपट दाखविणे असे उपक्रम राबविले. या उपक्रमांना वारकऱ्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तुम्ही दिलेली ही पुस्तकं मी वाचीन आणि गावांकडे महिलांचे प्रबोधन करीन, अशी पोचपावती मिळते, तेव्हा आपण केलेल्या प्रयत्नांचे सार्थक झाले, याची खात्री पटते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाची दखल घेत त्याची प्रशंसा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर उपक्रमात सक्रिय भाग घेतला.

महिला सक्षमीकरणासाठी राज्य महिला आयोग करीत असलेल्या प्रयत्न कुठे तरी फलद्रूप आहेत, याचेच प्रत्यंतर या वारीत दिसले. मुंबईतील कार्यालयात बसून कारभार करणे तुलनेने खूप सोपे ठरले असते, पण आम्ही आयोगाला थेट समाजाच्या तळागाळात नेत आहोत. अगदी गावागावांत जाणे शक्य होत नसले तरीही किमान जिल्ह्यांच्या पातळीवर आम्ही जात आहोत. महिलांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आमच्या परीने करीत आहोत. वारी नारीशक्ती हा उपक्रम याच प्रयत्नांचा एक भाग होता. भाविकांची इतकी मोठी संख्या असलेल्या ठिकाणी महिलांचे आरोग्य सांभाळणे ही फारच कठीण गोष्ट आहे. मात्र, हे शिवधनुष्य आपल्याला पेलावे लागणारच आहे. त्या दृष्टीने आम्ही खारीचा वाटा उचलला. या पंधरा दिवसांत आम्ही समाजाला जितके शिकविण्याचा प्रयत्न केला, त्यापेक्षाही अधिक आम्हाला शिकता आले, आमच्या भावी वाटचालीत या अनुभवाची संपन्न शिदोरी आमच्याबरोबर असेल. तिचा वापर आम्ही नक्कीच सकारात्मक पद्धतीने करून घेऊ. घराघरांत नांदणाऱ्या रखुमाईसाठी घरातील विठ्ठलानेही दोन पावले पुढे यावे, हीच अपेक्षा.

समाजात आजही महिलांच्या आरोग्याची आबाळ होते, हे वास्तव आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागात हे चित्र अधिक चिंताजनक आहे. सन २०१४ ते २०१९ या काळात ६५११ गरोदर मातांचा मृत्यू झाला आहे. गेल्या काही काळात मातामृत्यूच्या दरात घट झाली असली, तरीही एकाही मातेचा मृत्यू होऊ न देणे हेच समाज म्हणून आपले उद्दिष्ट असले पाहिजे. ते साध्य करण्याच्या दृष्टीने सर्वांनीच आपापल्या परीने हातभार लावला पाहिजे. त्यासाठी महिलांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होणे ही काळाची गरज आहे. ती ओळखूनच यंदा आम्ही वारी नारीशक्तीची हा उपक्रम राबविला. आपली जबाबदारी पार पाडण्यात भविष्यातही राज्य महिला आयोग मागे राहणार नाही, याची हमी अध्यक्ष या नात्याने मी महाराष्ट्रातील तमाम जनतेला देते.



**विजया रहाटकर,** मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

# अंतरंग...




## प्रज्वला योजनेसाठी पाच कोटींची तरतूद


९





## राज्य महिला आयोगाच्यावतीने नारी वारीशक्तीची उपक्रमाचे उद्घाटन

१५


## महिलांविषयक कौटुंबिक कायदे

महिलांविषयक कौटुंबिक कायदे विषयक जनजागृतीसाठी राज्य महिला आयोगाने 'विधिलिखित' ही पुस्तक मालिका प्रकाशित केली आहे. त्या मालिकेतील कौटुंबिक हिंसाचार कायद्याची माहिती...

२७





## मेरी कोमचे लक्ष्य ऑलिंपिक पदकाचे

मुष्टियुद्धाच्या क्षेत्रात सुपर मॉम म्हणून ओळखली जाणारी भारताची महान खेळाडू मेरी कोम कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यावर आहे. टोकियो ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक मिळवून कारकिर्दीची सांगता करण्याची तिची जिद्द आहे.

३२

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या नावानेच सात बारा उतारा


## राज्य महिला आयोगाच्या शिफारसी स्वीकारुन राज्य सरकारचे अनेक महत्वपूर्ण निर्णय

**मुंबई :** शेतीचा सात-बारा उतारा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विधवा पत्नीच्या नावावर करणे, पंतप्रधान घरकुल योजनेत विधवांना प्राधान्य देणे आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये या महिलांच्या मदतीसाठी विशेष सहाय्य कक्ष सुरु करणे, अशा महत्वपूर्ण निर्णयांचा समावेश असलेला शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. हे सर्व निर्णय महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे घेण्यात आले.

महसूल व वने विभागाने काढलेल्या या आदेशामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या मदतीसाठी सर्वंकष निर्णय घेण्यात आले आहेत. या विधवांसाठी विशेष वारसा नोंदणी हक्क शिबिरे घेऊन त्यांना जमिनीचा हक्क देणे, संपत्तीत वाटा मिळविताना या महिलांना प्राधान्य देणे, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांचे शिक्षण व त्यांच्या शुल्कासंबंधी विशेष धोरण आखणे, त्यांच्या स्वयंरोजगारासाठी त्यांना शासकीय योजनांमध्ये प्राधान्य देणे, आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये 'मनरेगा' योजना प्राधान्याने राबविणे, अन्न सुरक्षेचा लाभ त्यांना प्राधान्याने देणे अशा निर्णयांचा समावेश आहे. याशिवाय विधवांच्या कुटुंबाना हेल्थ कार्ड देणे. काही जिल्ह्यांमध्ये किसान मित्र हेल्पलाईन सुरु करणे आणि अधिकाऱ्यांना विधवा महिलांचे प्रश्न संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी प्रशिक्षण देणे हे निर्णय ही घेण्यात आले आहेत.

'महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने दिलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांबाबतच्या शिफारसी राज्य सरकारने स्वीकारल्याचे समाधान आहे. यामधून शेतकऱ्यांबाबत, त्यांच्या विधवांबाबत सरकारने संवेदनशीलता दाखविलेली आहे. या निर्णयाने विधवा महिलांना जमिनीच्या हक्कापासून वंचित ठेवण्याच्या प्रकरण आळा बसेल, असा विश्वास आहे' अशी प्रतिक्रिया आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी व्यक्त केली. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांच्या प्रश्नांची दखल घेऊन आयोगाने मराठवाडा व विदर्भात या महिलनशी संवाद साधला होता. सुमारे एक हजार विधवा महिलांशी चर्चा - मसलत करून त्याआधारे राज्य सरकारला नोव्हेंबर २०१८ मध्ये शिफारसी केल्या होत्या. कायद्यान्वये महिलांच्या प्रश्नांबाबत राज्य सरकारला शिफारसी करण्याचा अधिकार आयोगाला आहे.

> **'आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवांचे प्रश्न संवेदनशीलतेने हाताळण्याची गरज होती. काही ठिकाणी ते होत. मात्र, त्यास कायदेशीर आधार देण्याची गरज होती. हा विषय प्रशासकीय स्तरावर अधिक काळजीने सोडवावा, यासाठी शिफारशी केल्या होत्या. त्यासाठी अनेक जणींबरोबर संवाद साधला होता. राज्य शासनाने महिला आयोगाच्या शिफारशी मान्य करून घेतलेला निर्णय अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्याबद्दल राज्य शासनाचे आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानावेच लागतील.'**
>
> **– विजया रहाटकर,** अध्यक्ष, महिला आयोग महाराष्ट्र



# शेतात राबणाऱ्या माझ्या विधवा मायबहिणींसाठी... !

**शेतकऱ्यांची विवंचना सर्वांनाच समजते; पण त्याच्या सोबतीने निसर्गाशी, संकटांशी झुंजणाऱ्या महिला शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे भोग क्वचितच चर्चेत असतात. आत्महत्या करणारा धनी एका अर्थाने सर्व विवंचनातून सुटतो; पण त्याच्या मागे सगळ्या कुटुंबाची जबाबदारी विधवा भगिनी-मातेच्या खांद्यावर येऊन पडते. पती गेल्याच्या दु:खाचा डोंगर बाजूला सारून तिला कंबर कसून उभं राहावं लागतं. या विधवा महिलांसाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या शिफारशी स्वीकारून देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने नुकताच शासन आदेश काढला आहे. त्या निमित्ताने...**

विजया रहाटकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य महिला आयोग

शेतकरी आपल्या देशाचा कणा, पण त्याची दैना हे ही तितकेच शाश्वत. ज्या देशातले ८४ टक्क्यांपेक्षा जास्त शेतकरी निव्वळ पावसावर अवलंबून असतात, ज्या देशातल्या तब्बल ८६ टक्के शेतकऱ्यांकडे पाच एकरांपेक्षा कमी क्षेत्र असते, त्या भारतातील-महाराष्ट्रातील शेती फायद्यात असणं हे उंबराच्या फुलाइतकं दुर्मीळ. शेती फायद्यात येण्यासाठी अत्यावश्यक असणारं पाणी आणि क्षेत्र या दोन्हींची कमालीची कमतरता महाराष्ट्रात आहे. त्यामुळं शतकानुशतकं महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी पिचलेला राहिला आहे. शेतीचं ओझं खऱ्या अर्थानं डोईजड होत गेलं जेव्हा या शेतीवरचा बोजा वाढत गेला. म्हणजे शेतीवर अवलंबून असणा०यांची संख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या थेट ६० टक्क्यांपर्यंत पोहोचली, तेव्हा मुळातच आतबट्ट्याच्या असलेल्या शेती व्यवसायाला भीषण ग्रहण लागलं.

आत्महत्या करणारा धनी एका अर्थानं सर्व विवंचनातून सुटतो; पण त्याच्या मागे सगळ्या कुटुंबाची जबाबदारी माझ्या विधवा भगिनी-मातेच्या खांद्यावर येऊन पडते. पती गेल्याच्या दु:खाचा डोंगर बाजूला सारून तिला कंबर कसून उभं राहावं लागतं. स्वत:च्या मुलाबाळांसाठी, सासू-सास०यांसाठी. दु:ख सोसण्यासाठीचीही सवड तिला मिळत नाही. तिच्याकडे आजपर्यंत फारसे कुणी लक्ष दिलं नव्हतं.
म्हणून महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांच्या सुरक्षिततेचा, भविष्याचा मुद्दा अत्यंत गांभीर्यानं हाती घेतला. आम्ही विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने मराठवाडा आणि विदर्भात शेकडो आत्महत्याग्रस्त शेतक०यांच्या पत्नींशी संवाद साधला. हा प्रत्येक संवाद काळीज पिळवटून टाकणारा होता. या माझ्या माता-भगिनींना सोसाव्या लागणाऱ्या समस्या कोणत्या, त्यातून मार्ग कसा काढता येईल, याचा अभ्यास करून महिला आयोग ठोस निष्कर्ष, शिफारसी घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गेला होता. मला समाधान याचं आहे की, मुख्यमंत्र्यांनीही कमालीच्या संवेदनशीलतेनं संपूर्ण विषय तितक्याच गांभीर्यानं समजून घेतला. एवढंच नव्हे तर आयोगाच्या सगळ्या शिफारसी स्वीकारून त्याबाबतचा शासन आदेशही काढला.
हा शासन आदेश सर्वंकष आहे. विधवांच्या मदतीसाठी दहा मंत्रालयांवर जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणजे तर जमिनीचा सात-बारा उतारा विधवा महिलेच्या नावावर करण्याचा. दुर्दैवाने असे दिसते की, शेतक०याने आत्महत्या केल्यानंतर बहुतेक वेळेला त्याच्या जमिनीपासून त्याच्या पत्नीला दूर ठेवले जाते. कुटुंबातील अन्य व्यक्ती त्यात कोलदांडा घालत असतात.

जमिनीच्या हक्कापासून तिला वंचित ठेवण्याचे सरसकट प्रकार दिसतात. शासनाच्या निर्णयाने त्याला मोठ्या प्रमाणात आळा बसेल. त्यासाठी विशेष वारसाहक्क नोंदणी शिबिर घेऊन विधवा महिलांच्या नावावर सात-बारा करून त्यांना जमिनीचा हक्क मिळवून देण्याचाही निर्णय झाला आहे. जमीन नावावर नसल्याने घरकुले मिळत नाहीत, अन्न सुरक्षेचे लाभही मिळत नाहीत. सरकारने या दोन्हींमध्ये शेतकरी विधवांना प्राधान्य देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलाय. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात या महिलांना विशेष साहाय्य कक्ष सुरू करणे, त्यांना हेल्थ कार्ड देणे, त्यांच्या पाल्यांसाठी मोफत शुल्क योजना राबविणे, अशा अनेक निर्णयांचाही समावेश शासन आदेशात आहे. विधवांचे प्रश्न संवेदनशीलपणे सोडविण्यासाठी अधिका०यांचे विशेष प्रशिक्षण घेण्याचाही निर्णय सरकारने घेतलेला आहे. मला माहितेय की, या निर्णयांनी विधवांचे सगळेच प्रश्न सुटणार नाहीत. आभाळ फाटलंय खरंय, तरीही दोन टाके घालायला काय हरकत आहे? मला विश्वास आहे, असा दिवस येईल की शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळच येणार नाही; पण तोवर माझ्या शेतकरी माता-भगिनींसाठी सर्व शक्ती पणाला लावणं, हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

**(दै. लोकमतवरून साभार)**





# नारी तू नारायणी

## केंद्रीय अर्थसंकल्पात महिलांसाठी योजना

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने यंदाच्या कार्यकाळातील आपल्या पहिल्याच अर्थसंकल्पात महिलांसाठी नारी तू नारायणी अशी घोषणा देत महिलांसाठी भरीव तरतूद केली आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी या अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या या अर्थसंकल्पात महिलांसाठीच्या योजनांवर भर देण्यात आला आहे. महिला बचतगटांना एक लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देण्याची परवानगी देण्यात आली आहे. महिला नेतृत्वाला पुढे आणण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. यंदा लोकसभेत प्रथमच ७८ महिला खासदार निवडून आल्या आहेत, याचाही उल्लेख अर्थमंत्र्यांनी आवर्जून केला.

### अर्थसंकल्पातील महिलांसाठीच्या तरतुदी

- **महिला बचतगटातील प्रत्येक सदस्य महिलेला एक लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देण्याची मंजुरी**
- **जन धन खात्यांवर पाच हजार रुपयांपर्यंत ओव्हरड्राफ्ट सुविधा (या योजनेतील बहुतांशी खाती महिलांची आहेत.)**
- **नोकरदार महिलांना मात्र करात कोणतीही सवलत नाही**
- **नारी तू नारायणी योजनेसाठी सल्लागार समितीची स्थापना**
- **स्टँड अप इंडिया योजनेतून महिला उद्योजकांना लाभ देणार**
- **बचटगतटांचे अभियान देशातील प्रत्येक जिल्ह्यापर्यंत नेणार**
- **मुद्रा आणि स्टँड अप योजनेत महिलांना प्राधान्य**
- **अनुसूचित जाती-जमातीच्या महिलांना व्यवसायात मदत व्हावी, यासाठी पंधराव्या वित्त आयोगात विशेष योजना आखणार**

> In India's growth story, particularly in the rural economy, "grameen arth vyavastha" the role of women is a very sweet story. This Government wishes to encourage and facilitate this role of women.

> Swami Vivekananda in a letter to Swami Tamakrishnanda had said: "There is no chance for the welfare of the world unless the condition of women is improved. It is not possible for a bird to fly on one wing" This Government believes that we can make progress with greater women's participation.

> **महिलांचे योगदान वाढल्यासच देश प्रगती करू शकेल, असे आमच्या सरकारचे मत आहे.**
>
> – **निर्मला सीतारामन,** केंद्रीय अर्थमंत्री

# प्रज्वला योजनेसाठी पाच कोटींची तरतूद

राज्य अर्थसंकल्पात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मंजूर केला भरीव निधी

**मुंबई :** महिला आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला योजनेसाठी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. प्रज्वला योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात येत असून, दुसऱ्या टप्प्यात 'एक जिल्हा, एक वस्तू' असे कुलस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळेल. महिला बचत गटांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रज्वला योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात 'बचत गट बाझार' जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्यात येतील. प्रतिकूल परिस्थितीत असणाऱ्या विधवा, परित्यक्ता आणि घटस्फोटित महिलांना स्वयंरोजगारासाठी तरतूद, एक अपत्य असलेल्या विधवा महिलेला दरमहा अकराशे रुपये, तर दोन अपत्य असलेल्या विधवा महिलेला बाराशे रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येणार आहे.



# विजया रहाटकर यांच्याकडून सरकारचे आभार

**मुंबई** : राज्य सरकारचा नुकताच सादर झालेला अर्थसंकल्प महिलांच्या आर्थिक, सामाजिक सक्षमीकरणाचा असल्याचे सांगत महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला योजनेसाठी पाच कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केल्याबद्दल राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

प्रज्वला योजनेसाठी भरीव तरतूद-महिला बचत गटांची आर्थिक, सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगा मार्फत प्रज्वला योजना राबविण्यात येत आहे. यासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रज्वला योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात येत असून दुसऱ्या टप्प्यात 'एक जिल्हा, एक वस्तू' असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळेल. महिला बचत गटांनी क्लस्टर्सच्या माध्यमातून तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रज्वला योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात 'बचत गट बाझार' जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्यात येतील.

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीनं भरीव तरतूद असणाऱ्या विविध योजना आज अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मांडल्या आहेत. महिला अत्याचारांच्या गुन्ह्यांना आळा घालण्याच्या दृष्टीनं कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महिला सुरक्षितता पुढाकार योजना तीन वर्षांच्या कालावधीसाठी राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रतिकूल परिस्थितीत असणाऱ्या विधवा, परित्यक्त्या आणि घटस्फोटीत महिलांना स्वयंरोजगारासाठी तरतूद, एक अपत्य असलेल्या विधवा महिलेला दरमहा अकराशे रुपये तर दोन अपत्य असलेल्या विधवा महिलेला बाराशे रुपयांचं अर्थसहाय देण्यात येणार आहेत. अल्पसंख्याक महिला आणि युवकांच्या रोजगारासाठी कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीनं १०० कोटी रुपयांची तर मागास प्रवर्गातील मुलींकरता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ही नवीन शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली असून, या योजनेचा फायदा २ लाख २० हजार विद्यार्थिनींना होणार आहे. अर्थसंकल्प महिलांच्या सर्वंकक्ष सक्षमीकरणाचा अर्थसंकल्प असल्याचे विजया रहाटकर यांनी यावेळी सांगितले.

# बचत गटांसाठी नवे पाऊल
# प्रज्वला...

## ध्यास सर्वांगीण सक्षमीकरणाचा

- समाजात महिलांचे स्थान उंचावणे, हे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे मुख्य ध्येय; तर महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण हा ध्यास!
- सर्वच सक्षमीकरणाचा पाया असतो ते आर्थिक स्वावलंबन... स्वतःच्या पायावर उभे राहणे.
- म्हणून आयोगाने आर्थिक सक्षमीकरणावर सर्वाधिक भर दिलेला आहे.

*म्हणून बचत गट महत्वाचे...*

- बचत गटांना ताकत दिल्याशिवाय आर्थिक सक्षमीकरण होऊच शकत नाही.

*त्यासाठी बचत गट महत्वाचे...*

- राज्यात सुमारे तीन लाख बचत गट आणि त्यात सहभागी असलेल्यांची संख्या सुमारे ६० लाख. म्हणजे राज्यातील १४ टक्के महिला बचत गटांशी जोडलेल्या
- ही संख्या लक्षणीय; पण अन्य राज्यांच्या तुलनेत फारच कमी. उदा. तेलंगणा ५० टक्के, आंध्र ४० टक्के, केरळ २८ टक्के, कर्नाटक-तमिळनाडूमध्ये १७ टक्के महिला बचत गटांशी जोडलेल्या.

## 'प्रज्वला'...नवे पाऊल

- थोडक्यात बचत गटांमध्ये प्रचंड काम करण्याची संधी उपलब्ध
- म्हणूनच नियोजन विभाग आणि ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने बचत गटांसाठी नवी योजना आणण्याचे ठरविले आहे.
- तिचे नाव असेल 'प्रज्वला'... स्वतःच्या पायावर उभी राहण्यासाठी प्रज्वलित झालेली प्रज्वला..!

## 'प्रज्वला'ची उद्दिष्टे...

- बचत गटांचे आर्थिक सक्षमीकरण हे मुख्य उद्दिष्ट
- त्यासाठी व्यावसायिक कौशल्ये वाढविण्यास मदत करणे, उत्पादित वस्तूंचे ब्रँडिंग करण्यास मदत करणे
- महत्वाचे म्हणजे उत्पादनांच्या विक्रीसाठी स्थायी व्यवस्था उभी करणे

## टप्पा पहिला कार्यशाळांचा

- 'प्रज्वला' ही योजना तीन टप्प्यांत राबविली जाईल.
- पहिल्या टप्प्यात राज्यातील सर्व विधानसभा क्षेत्रामध्ये बचत गटांसाठी एक दिवशीय कार्यशाळा घेतली जाईल.
- सरकारी योजनांची माहिती ते मार्केटिंग-व्यवस्थापन कौशल्यांचे प्रशिक्षण असे त्याचे स्वरूप असेल.
- या कार्यशाळा ऑगस्ट २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असेल.

## टप्पा दुसरा क्लस्टरचा...

- दुसऱया टप्प्यांमध्ये बचत गटांचे क्लस्टर तयार केले जातील.
- एक जिल्हा, एक वस्तू असे त्या क्लस्टरचे वैशिष्ठ असेल.
- या टप्प्यामध्ये प्रारंभिक बारा जिल्हे समाविष्ठ असतील. ते पुढीलप्रमाणे-पालघर, नगर, सांगली, नाशिक, जळगाव, औरंगाबाद, लातूर, जालना, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, अमरावती.

## टप्पा तिसरा बचत गट बाजारांचा...

- या टप्प्यात बचत गट बाजार बांधण्याचे नियोजन आहे.
- हे बचत गट बाजारदेखील वर उल्लेख केलेल्या प्रारंभिक बारा जिल्ह्यांमध्येच उभे केले जातील.
- या बचत गट बाजारांची रचना एकसमान असेल. त्याचे डिझाईन महिला आयोगाकडून उपलब्ध करून दिले जाईल.



# बचत गटांसाठीचा 'प्रज्वला'चा नंदुरबार येथे शुभारंभ

## महिलांचा मोठा प्रतिसाद

**नंदुरबार :** जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून महिला बचत गटांच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी नंदुरबार येथे मॉल उभारण्यात येईल, त्यासाठी प्रशासनाने तात्काळ सरकारी जागा उपलब्ध करून द्यावी, असे प्रतिपादन राज्याचे पर्यटन, रोहयो, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर येथे राज्य महिला आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रज्वला उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, खासदार डॉ.हीना गावीत, आमदार डॉ.विजयकुमार गावीत, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, अतिरिक्त पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी, प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दिपाली मोकाशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बापूराव भवाने, गटविकास अधिकारी अशोक पटाईत आदी उपस्थित होते.

श्री.रावल म्हणाले, राज्यातील बचत गटांच्या उत्पादनांचे चांगले ब्रँडींग आणि पॅकेजींग करून त्यांना बाजारपेठ मिळवून देणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने प्रज्वला योजनेअंतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. आदिवासी भागातील पारंपरिक दागिने, आमचूर, पारंपरिक हस्तकला अशा उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळूवन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या नव्याने तयार होणाऱ्या ॲपच्या माध्यमातून बचत गटाच्या उत्पादनांची माहिती देण्यात येईल. पर्यटन विभागाच्या हाटच्या माध्यमातूनदेखील बचत गटांच्या उत्पादनांसाठी गाळे उपलब्ध करून देण्यात येतील.

## 'प्रज्वला'चा दुसरा टप्पादेखील नंदुरबारपासून सुरू करणार : रहाटकर

'प्रज्वला' अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षीत करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात क्लस्टरद्वारे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ नंदुरबार जिल्ह्यातूनच करण्यात येईल, अशी ग्वाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली.त्या म्हणाल्या, प्रजवला योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण, दुसऱ्या टप्प्यात क्लस्टरनिर्मिती व बाजारपेठ उभारणे व तिसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थेने जागा उपलब्ध करून दिल्यास प्रज्वला बचत गट बाजाराची उभारणी करण्यात येणार आहे. राज्यातील ६० लाख महिलांनी ३ लाख बचत गट उभे केले असून या सर्व महिलांना या अभियानाच्या माध्यमातून स्वावलंबी करावयाचे आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना मार्केटींगचे तंत्र देण्यात येणार आहे. महिलांनी आत्मविश्वासाने या अभियानात सहभागी व्हावे. महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहिती प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. कुटुंब सक्षम होण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण महत्वाचे आहे. महिला छोटी बचत करून कुटुंब सक्षम करू शकतात. महिलांनी पैसा टिकवून मुलांचे शिक्षण करावे, असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील २८८ विधानसभा क्षेत्रात हे अभियान पोहोचविण्यात येणार असून सर्वांनी मिळून बचत गटाची चळवळ पुढे न्यावी. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य महिला आयोगाचे सर्व सहकार्य राहील, अशी ग्वाही श्रीमती रहाटकर यांनी दिली.




**'साद' हे आयोगाचे मुखपत्र वाचताना नंदूरबारचे पालकमंत्री श्री. जयकुमार रावळ.**

महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी महिलांचे सबलीकरण महत्वाचे असून प्रज्वला अभियान हे त्यादिशने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. या अभियानाद्वारे महिलांना एकत्रित आणणे, त्यांचे संघटन, स्वावलंबन, आर्थिक नियोजन आणि विकास अशी प्रणाली तयार होते. या प्रणालीच्या माध्यमातून बचत गटांची महिलांना विकासाची संधी देणारी सक्षम व्यवस्था तयार होणार आहे.

प्रज्वला योजनेच्या माध्यमातून उत्पादनांचे विपणन चांगल्यारितीने होणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर महिलांच्या पारंपरिक कौशल्याला वाव देणे आवश्यक असून त्यासाठी पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासोबत विधवा, परितक्त्या आणि गरजू महिलांना धान्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे श्री.रावल यांनी सांगितले.

खासदार गावीत म्हणाल्या, महिलांना कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रज्वला योजनेच्या माध्यमातून वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर क्लस्टर तयार करून त्याद्वारे वस्तू उत्पादनाला सुरूवात करण्यात येणार आहे. राज्य महिला आयोगामार्फत या वस्तूंच्या विक्रीची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. हस्तकलेच्या वस्तुंना चांगली मागणी असून धडगाव येथे महूपासून जॅम आणि सरबत तयार करण्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकारचे अर्थसहाय्य मिळणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. आमदार गावीत यांनी महिला एकत्र आल्यास त्याचा अधिक लाभ होऊ शकेल असे सांगितले. शासनाचा चांगल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. महिलांनी एकत्र येऊन एकच उत्पादन केल्यास त्याला चांगली बाजारपेठ मिळू शकेल. मात्र त्यासाठी गुणवत्तेवरही भर द्यावा, असे ते म्हणाले.

श्रीमती मोकाशी यांनी प्रज्वला योजनेची माहिती दिली. तर राज्य आयोगाच्या माजी सदस्या देवयानी ठाकरे यांनी महिलांसाठी शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची तर ॲड. उमा चौधरी यांनी कायदेविषयक माहिती दिली. तत्पूर्वी श्रीमती रहाटकर यांनी बचत गटाच्या महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या स्टॉल्सला भेट दिली.

# 'प्रज्वला' योजनेतंर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल : रहाटकर

**नाशिक :** राज्यातील बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे महत्वाचे असून त्यादृष्टीने 'प्रज्वला' योजनेअतंर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला.

गायत्री लॉन, दुगाव, गिरनारे रोड येथे राज्य महिला आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या 'प्रज्वला' उपक्रमाच्या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयोगाच्या प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दिपाली मोकाशी, आमदार सीमा हिरे, महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त सुरेखा पाटील, पंचायत समिती सभापती रत्नाकर चुंबळे, सरंपच अलका दिवे, पुष्पा जाधव आदी उपस्थित होते.

श्रीमती रहाटकर म्हणाल्या, महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी महिलांचे सबलीकरण महत्वाचे असून प्रज्वला अभियान हे त्या दिशने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. या अभियानाच्या माध्यमातून बचत गटांची महिलांना विकासाची संधी देणारी सक्षम व्यवस्था तयार होणार आहे. महिलांचे अनेक कायद्यांच्या माध्यमातुन संरक्षण केले जाते व शासनाच्या विविध



योजनांद्वारे सक्षमीकरण केले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

'महिला उद्योग धोरण' तयार करणारे महाराष्ट्र एकमेव राज्य असून या माध्यमातून महिलांना उद्योगवाढी सवलती मिळणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या महिला बाल विकास विभागाच्या अनेक

योजनांची त्यांनी महिलांना माहिती दिली तसेच महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य महिला आयोगाचे सर्व सहकार्य राहील, असही श्रीमती रहाटकर यांनी सांगितले.

श्रीमती मोकाशी यांनी, 'प्रज्वला' अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षीत करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात क्लस्टरद्वारे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात आहे. तसेच तिसऱ्या टप्प्याद्वारे बचतगटांसाठी बाजाराची उभारणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यशाळेत ॲड. सुवर्णा शेफाळ यांनी महिलांविषयक असलेल्या कायदयाची व पीसीपीएनडीटी कायद्याविषयी माहिती सांगितली. तसेच बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रतिनिधी सुनंदा सोनवणे यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अपघात विमा योजना, अटल पेंशन व विविध कर्जाच्या योजनाविषयी महिलांना माहिती दिली.

प्रातिनिधीक स्वरुपात श्रीमती रहाटकर यांचे हस्ते बचतगटाच्या महिलांना सहभाग प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. कार्यशाळेस बचतगटाच्या एकुण ६०० महिला उपस्थित होत्या.

## 'प्रज्वला' योजनेच्या प्रशिक्षणाची राज्यभरातील क्षणचित्रे




**धुळे येथे बचत गटांच्या महिलांचा मोठा प्रतिसाद. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, महापौर चंद्रकांत सोनवणे, उपमहापौर कल्याणी आम्पलकर उपस्थित होते.**



**आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचे मिरजमधील प्रशिक्षणात प्रतिपादन. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित राऊत उपस्थित होते.**




**आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचे सांगलीतील प्रशिक्षणात आवाहन. यावेळी महापौर संगीता खोत, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हा पोलिस अधीक्षक सोहेल शर्मा प्रामुख्याने उपस्थित होते.**



**प्रज्वला योजनेच्या प्रशिक्षणाला सावंतवाडी येथे बचत गट महिलांचा मोठा प्रतिसाद. पालक मंत्री श्री दीपक केसरकर, दीपाली मोकाशी, शलाका सालवी, मीनल मोहाडीकर उपस्थित होते.**




महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी इस्लामपूर येथील प्रशिक्षणास मार्गदर्शन केले.



महिला आयोगाच्या 'प्रज्वला' योजनेचे शिराळा (जि सांगली) येथील प्रशिक्षणाचे उद्घाटन आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, आमदार शिवाजीराव नाईक, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित राऊत यांच्या उपस्थितीत झाले. योजना, कायदे, बँकिंग साक्षरता आदींची माहिती देण्यात आली.



प्रज्वला योजनेच्या प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद...

# बचत गटांना एक आवाहन

## चला, प्रज्ज्वलित होऊ या...!

माझ्या मैत्रिणींनो,

या गरीब, ग्रामीण, अर्धशिक्षीत बाया-बापड्या पैसा कसा गोळा करणार? त्यातून स्वयंरोजगार कसा मिळवणार? अशा शंकाकुशंकांना, तुमच्यावर अविश्‍वास दाखविणाऱ्या सर्वांनाच तुम्ही अपार मेहनतीने बचत गटांना यशस्वी करून जबरदस्त प्रत्युत्तर दिलेत, याबद्दल मी सर्वप्रथम तुमचे अगदी आभार मानते! अभिनंदन करते!! आणि हो, तुमच्या कर्तृत्वाचा सार्थ अभिमानही बाळगते..!!!

तुम्ही उभे केलंलं, उभे करीत असलेले काम अजिबात सोप्प नाही. त्यामुळे शंकेखोरांची भीती एका अर्थाने चुकीची नव्हती. पण तुम्ही कधी डगमगला नाहीत. गावगाड्यात राहून, यंत्रणांच्या मदतीने, कधी कधी समाजाच्या सहकार्याने तुम्ही लढत राहिलात. नेटाने, चिकाटीने आणि जिद्दीने काम करीत राहिलात आणि बघता बघता उत्तम पद्धतीने बचत गट बांधत राहिलात. तुम्ही सुमारे ५८ लाख जणींनी मिळून राज्यात सुमारे पावणे तीन लाख बचत गट बांधलेत. ही निम्म्या लोकसंख्येच्या आर्थिक सक्षमीकरणाची मूक क्रांतीच आहे.

*तुम्ही घडवित आहात अंगभूत क्षमतांचा सर्वोच्च आविष्कार...*
*तुम्ही दाखवून देत आहात स्वबळावर हिमतीने लढण्याची ताकद...*
*तुम्ही घडवित आहात समर्थ स्त्री शक्तीचे सर्वंकष प्रत्यंतर...*
*तुम्ही दाखवित आहात बचतीतून एकजूट आणि एकजूटीतून शक्ती...*

पण तरीही आपल्याला खूप मोठा पल्ला गाठायचाय. केंद्र व महाराष्ट्र सरकार बचत गटांसाठी वेगवेगळ्या योजना आखतंय. कमी व्याजदराने कर्ज, उत्पादित मालांसाठी बाजारपेठेचा विकास करण्यासाठी अनेक पावले टाकत आहेत. मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस, महिला व बाल कल्याण मंत्री मा. पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक योजना आखल्या गेल्यात. अर्थमंत्री मा. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यासाठी निधी कमी पडू दिलेला नाही. महाराष्ट्र राज्य महिला आयोगदेखील त्यात मागे नाही. आयोगानेही आपल्यासाठी ‘प्रज्ज्वला’ योजना आखलीय. ती तीन टप्प्यांत असेल. पहिल्या टप्प्यांत प्रशिक्षण, दुसऱ्या टप्प्यांत एक जिल्हा, एक वस्तूची क्लस्टर्स निर्मिती आणि तिसऱ्या टप्प्यांत बचत गटांच्या उत्पादित मालांना विक्रीसाठी बचत गट बाजारांची उभारणी अशी ही ‘प्रज्ज्वला’ योजना आहे. मला खात्री आहे, की या योजनेने राज्यातील बचत गट आणखी प्रज्ज्वलित होतील. ते अधिक सक्षम होतील!

*संत रामदासांनी लिहून ठेवलंय... जोडोनिया धन उत्तम वेव्हारें*
*उदार विचारे वेंच करी।*

म्हणजे उत्तम व्यवहाराने धन कमवा; पण अतिशय विचारपूर्वक खर्च करा. म्हणजे पैसा टिकेल. आपल्या सर्वांना हे शब्द धन मान्यच आहे. त्यासाठी बचत गट नावाचे ब्रह्मास्त्र आपल्याकडे आहेच. ते आणखी बळकट करू यात...

धन्यवाद!

**विजया रहाटकर**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य महिला आयोग

# वारी नारीशक्तीची



राज्य महिला आयोगाच्या 'वारी नारी शक्ती' उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक आदी.

# ‘नारी वारीशक्ती’ची उपक्रमाचे उदघाटन

**पुणे :** वारीमध्ये महिलांचा लक्षणीय सहभाग लक्षात घेता महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वारी नारीशक्तीची उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले . या कार्यक्रमांतर्गत या वर्षी महिला सक्षमीकरणाचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेऊन दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. वारीचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य महिला आयोग यंदा पालखी सोहळ्यामध्ये चित्ररथ आणि महिला सक्षमीकरणाची दिंडी सामील करणार आहे. या चित्ररथाचा आणि दिंडीचा शुभारंभ शनिवारवाडा,पुणे येथुंन गुरुवारी करण्यात आला. या शुभारंभ प्रसंगी आमदार आणि विधानसभेच्या नवनिर्वाचित उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक, संत साहित्याचे अभ्यासक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, महिला आयोगाच्या सदस्य सचिव मंजुषा मोळवणे, माजी सदस्य वृंदा किर्तीकर, योगेश गोगावले, राधाबाई सोकासे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्या आमदार आणि नवनिर्वाचित विधानसभेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, पुणे शहराची प्रबोधनाची परंपरा लक्षात घेता महिला आयोगाने दिंडीची सुरुवात पुण्यात करून एक चांगला पायंडा पाडला आहे. महिलांविषयीच्या प्रबोधनाचे काम हे केवळ महिला आयोगाचे नसून ते प्रत्येक नागरिकाचे आहे. आणि प्रत्येकाने ते केले पाहिजे. त्यामुळेच ऑनर किलिंग, जातपंचायतीचे बहिष्कार, लहान मुलींवर होणारे अत्याचार यांसारखे प्रकार अजूनही घडताना दिसतात. त्यामुळे महिलांसंबंधी प्रबोधनाच्या कार्यात स्त्री- पुरुष असे दोघांनी सहभागी होणे गरजेचे आहे.

याप्रसंगी बोलताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर म्हणाल्या कि, महिलांसंबंधी अनेक कायदे आणि योजना आहेत ज्यांची माहिती सहसा महिलांचं नसते, या योजना महिलांपर्यंत पोहोचवण्याचे काम आम्ही या उपक्रमाअंतर्गत करणार आहोत. या योजनांचा लाभ घेऊन कुटुंबाचा कणा असलेली महिला नक्कीच आत्मनिर्भर आणि सबळ होऊ शकेल आणि त्यांचे समाजातील स्थान उंचावेल. अशाप्रकारे आम्ही आमचे महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट समोर ठेऊन ही महिला सक्षमीकरणाच्या आणि सबलीकरणाच्या वारीमध्ये सहभागी झालो आहोत.

पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक यांनी सुद्धा कार्यक्रमास हजर राहून महिला आयोगाच्या या उपक्रमास त्यांनी मनपूर्वक शुभेच्छा देऊन महिला आयोगाचे कौतुक केले. संत साहित्याचे अभ्यासक आणि संत तुकारामांचे वंशज डॉ. सदानंद मोरे याप्रसंगी बोलताना म्हणाले कि, या उपक्रमाकरिता मी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचे मनापासून धन्यवाद देतो कि त्यांनी या यानिमित्ताने आयोगाला महाराष्ट्राच्या महत्वाच्या परंपरेशी जोडून घेतले. शनिवारवाड्यामध्ये चित्ररथाचे लोकार्पण झाल्यानंतर तेथून भिडेवाड्यापर्यंत (जिथे क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले यांनी मुलींची देशातील पहिली शाळा सुरू केली) दिंडी काढण्यात आली. यामध्ये या मान्यवरांसोबत महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.




वारी नारीशक्तीची या दिंडीचे वैशिष्ट म्हणजे या दिंडीमध्ये दोन्ही मार्गांवरील चित्ररथांमध्ये सॅनिटरी नॅपकिन्सची व्हेंडिंग मशिन्स आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी इनसिनेटर मशीन्स होती. नॅपकिन वापरांबाबत आणि पर्यायाने मासिक पाळीतील स्वच्छतेबाबत जागृती करण्याचा हेतू यामागे आहे. यासाठी महिला व बाल कल्याण मंत्रालयाने भरीव सहकार्य केले आहे.

# ‘वारी नारी शक्ती’ उपक्रमाने यशाचा कळसाध्याय गाठावा



### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आयोगाच्या उपक्रमाला शुभेच्छा, देशभर अनुकरण करण्याची सूचना


## पंतप्रधानांचा शुभेच्छा संदेश

दिनांक १० जुलै २०१९

प्रती,
**विजया रहाटकर जी,**
अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग

‘महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने ‘वारी नारी शक्ती’ हा उपक्रम हाती घेतल्याचे समजले आणि अत्यंत आनंद झाला. आजच्या आधुनिक समाजात असे उपक्रम ही काळाची गरज बनली आहे. फार पूर्वीपासून आपल्याकडे महिलांना समाजात अत्यंत मानाचे स्थान दिले जाते. आपला समाज आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक जडणघडणीत महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पुराणांमध्ये स्त्रियांना शक्तीचे रूप मानले गेले आहे. महिलांनी क्षमता सिद्ध केली नाही, असे आज समाजात एकही क्षेत्र नसावे. लष्कर असो वा अवकाश विज्ञान, शिक्षण असो, क्रीडा असो, महिलांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. आजच्या आत्मविश्वासपूर्ण, स्वावलंबी स्त्रिया कुटुंबांचे, समाजाचे, देशाचे नेतृत्व करून त्यांना वेगळ्या उंचीवर नेत आहेत. महिलांच्या नेतृत्वाखाली विकास या संकल्पनेवर आमच्या सरकारचा दृढ विश्वास आहे. मुलींबाबतचा समाजाचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलण्याच्या हेतूने आम्ही ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ मोहीम राबविली. मुलींना आर्थिक सुरक्षितता प्राप्त व्हावी, यासाठी आम्ही ‘सुकन्या समृद्धी’ योजना आणली. महिलांचे आरोग्य आणि राहणीमान सुधारावे यासाठी आम्ही ‘इंद्रधनुष’, ‘पंतप्रधान मातृवंदना योजना’ आणि ‘पंतप्रधान सुरक्षित मातृत्व अभियान’ यासारख्या योजना राबविल्या. या मोहिमांतून आमच्या नव्या भारताच्या संकल्पनेचे प्रतिबिंब दिसते. देशाला विकासाच्या आणि प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठीच्या प्रयत्नांमध्ये महिलांचा सर्वोच्च सहभाग राहील आणि त्यांना समान संधी मिळेल, हे या मोहिमांमधून सुनिश्चित होते. महिलांमध्ये आरोग्य आणि स्वच्छता याविषयी जागृती करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहेत. अशा उपक्रमांचे अनुकरण देशभर झाले पाहिजे. वारी नारी शक्ती या उपक्रमाला महिलांचा व्यापक प्रतिसाद मिळून, हा उपक्रम यशाचा कळसाध्याय गाठो, अशी प्रार्थना मी करतो. महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि आषाढी पालखी सोहळ्यात सहभागी भाविक आणि संयोजकांना

**हार्दिक शुभेच्छा...**



प्रधान मंत्री
Prime Minister
MESSAGE

It is heartening to learn that Maharashtra State Commission for Women is undertaking "Vari Nari Shakti" initiatives to empower women. The initiatives are the need of the hour and most timely for every modern-day society.

Women have been accorded the highest respect in our country since the earliest times and have always had a significant impact on the socio-cultural milieu of our society and nation. In Indian mythology, women are an incarnation of Shakti – the Goddess of power. Today, there is hardly any sphere of activity in which women have not proven themselves. Be it the realm of armed forces, space, education or sports, women have excelled in all walks of life and charted new territory. Today's self-reliant, self-confident women are leading the family, society and nation to greater heights.

Our Government firmly believes in women-led development. We launched 'Beti Bachao Padhao' initiative to bring about a transformational shift in the social attitude towards girls. We introduced the Pradhan Mantri Sukanya Samriddhi Yojana to enhance financial security of girls. In an effort to secure good health for our womenfolk, we have also implemented schemes like Mission Indradhanush, Pradhan Mantri Matru Vandana Yojana and Pradhan Mantri Surakshit Matritva Abhiyan. These initiatives reflect our vision of a 'New India' and efforts at providing an equal opportunity to ensure maximum contribution of women in the nation's march on the path of development and progress.

The initiatives to enhance awareness levels of women on health, sanitation and hygiene are indeed laudable and must be emulated across the nation. May the "Vari Nari Shakti" efforts be crowned with success through widespread participation of women.

Best wishes to Maharashtra State Commission for Women, as well as organizers and participants of Pandharpur Ashadhi Palakhi Sohala.

(Narendra Modi)

New Delhi
आषाढ 19, शक संवत् 1941
10th July, 2019

**Smt. Vijaya Rahatkar**
Chairperson
Maharashtra State Commission for Women Welfare
Gruha Nirman Bhawan (MHADA Building)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (East)
Mumbai, Maharashtra – 400051

# ‘वारी नारी शक्ती’ची उपक्रम महिलांसाठी नवे व्यासपीठ : मुख्यमंत्री

**पंढरपूर :** वारी नारी शक्तीची उपक्रमाने महिला योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी नवे व्यासपीठ मिळाले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारी नारीशक्तीची या उपक्रमाच्या सांगता समारोहात केले.

राज्य महिला आयोगाच्यावतीने यंदाच्या आषाढी वारीत संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर वारी नारीशक्तीची उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा समारोप पंढरपूर येथील शासकीय विश्रमगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमास सामाजिक न्यायमंत्री सुरेश खाडे, पशुसंवर्धनमंत्री महादेव जानकर, जिल्ह्याचे पालकमंत्री विजय देशमुख, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्यासह मान्यवर पदाधिकारी व महिला आयोगाचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, 'महिला आयोगाने आषाढी वारीमध्ये वारी नारीशक्ती अभिनव संकल्पना राबवून महिलांविषयीच्या योजनांच्या प्रसिद्धीस नवे दालन उपलब्ध केले. महाराष्ट्रात आषाढी वारीला सातशे वर्षाची परंपरा आहे व इतिहास आहे. वारी सज्जन शक्तीचा आविष्कार असून या शक्तीचा वापर महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला आयोगाने या उपक्रमाच्या माध्यमातून केला आहे. वारी नारीशक्तीची या उपक्रमातून महिलांसाठी असणारे कायदे, आरोग्य योजना व त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहचविण्यास मदत झाली.'

श्रीमती विजया रहाटकर म्हणाल्या, 'राज्य शासन महिला केंद्री अनेक योजना राबवित आहे. शासकीय योजनांची माहिती महिलांना व्हावी यासाठी महिला आयोगाने वारी नारीशक्तीची उपक्रम राबविला. वारीमध्ये प्रबोधनाच्या माध्यमातून योजनांचा प्रचार व प्रसार केला. वारी नारी शक्तीच्या उपक्रमात महिलांची काळजी घेण्याचे काम केले असून या

> “ महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने यंदा ‘वारी नारीशक्तीची’ हा एक अनोखा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमाबद्दल विजयाताई रहाटकर आणि त्यांच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन! या उपक्रमाचा समारोप पंढरपुरात झाला. वारी हा सज्जन शक्तीचा अविष्कार आहे. प्रतिकूलतेतही वारकऱ्यांनी वारी कधी सोडली नाही. त्यांची ही अध्यात्मिक शक्तीच आज महाराष्ट्राला पुढे नेते आहे. निर्मल वारीच्या माध्यमातून स्वच्छतेचा मोठा उद्देश साध्य होतो आहे. यात एका नवीन संकल्पनेची यंदा भर पडली. महिलांच्या विषयांवर जाणीव-जागृतीचे अनोखे उद्दिष्ट यातून साध्य करण्यात आले. महिला आयोगाचे यासाठी मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असे उपक्रम नेण्यासाठी वारीसारखे दुसरे माध्यम नाही. हा उपक्रम दरवर्षी राबविला जावा!
>
> – **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री




Thread

Devendra Fadnavis
@Dev_Fadnavis

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने यंदा 'वारी नारीशक्तीची' हा एक अनोखा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमाबद्दल विजयाताई रहाटकर आणि त्यांच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन!
या उपक्रमाचा समारोप आज पंढरपुरात झाला.
#विठ्ठल #Vitthal

Translate Tweet

कालावधीत सुमारे चार ते साडेचार लाख महिलांशी संवाद साधण्यात आला. माझी कन्या भाग्यश्री, अस्मिता सारख्या योजनांची माहिती महिलांना देऊन रोज प्रबोधनात्मक चित्रपट दाखविण्यात आले.

कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आषाढी वारी निमित्त दिलेल्या शुभेच्छा संदेशाची चित्रफीत दाखविण्यात आली.








मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता फडणवीस, मंत्री सुरेश खाडे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्या उपस्थितीत पंढरपुरात उपक्रमाचा समारोप झाला.



# आषाढी वारीत राबविण्यात आलेल्या 'वारी नारी शक्ती'ची उपक्रमाचा सचित्र वृत्तांत



उपक्रमाच्या उद्‌घाटनानंतर खांद्यावरून पालखी वाहताना विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, मुक्ता टिळक, विजया रहाटकर, मंगला खाडीलकर आदी.



डॉक्टरांच्या एका विशेष पथकाने आपली सेवा माऊली चरणी अर्पण करताना आयोगाच्या चित्ररथावरील सॅनिटरी नॅपकिन्सचे महत्त्व समजावून सांगितले.



पावले चालती पंढरीची वाट
माऊली पाहती आयोगाचा चित्ररथ...




आयोगाच्या चित्ररथावरील सॅनिटरी नॅपकिन्सचे महत्त्व समजावून देणारे डॉक्टर व स्वयंसेविकांचे पथक.



अनाथांसाठी सेवाकार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांच्या कार्यावर आधारित 'मी सिंधुताई सपकाळ' या प्रेरणादायी चित्रपटाला वारकरी बंधू भगिनींचा मोठा प्रतिसाद.



कायदेविषयक आणि सरकारच्या योजनाची माहिती देताना आयोगाचे स्वयंसेवक.



कायदेविषयक आणि सरकारच्या योजनाची माहिती देताना आयोगाचे स्वयंसेवक.



'माझ्या आईला वाचता येत नाही; पण मी तिला वाचून दाखविणार आहे.' आयोगाची पुस्तके घेण्यासाठी आलेल्या या छोटा भाविकाचे हे वाक्य आयोगाच्या 'टीम'ला समाधान देऊन गेले.




आयोगाच्या चित्ररथावर पाहुणे म्हणून आलेल्या क्रीडापटू आणि धावपटूंनी आरोग्याचे, सरकारच्या योजनांचे महत्त्व समजावले.



आयोगाने जनजागृतीसाठी प्रकाशित केलेली पुस्तके पुरुष भाविकांनीही मन लाउन वाचली.



जनजागृतीसाठी महिला शाहीर, कीर्तनकार आणि पोवाडेकारही सरसावले. उंडवडी पठार येथे शाहीर विनता जोशी यांचे शिवराय स्तवन आणि महिला सक्षमीकरण पोवाडा झाला.




सॅनिटरी नॅपकिन्सबद्दल महिला आयोगाने छान माहिती दिली. आभारी आहोत. इंदापूरच्या विठ्ठल रूक्मिणी सेवाभावी संस्थेच्या महिलांनी दिलेली कौतुकाची थाप.



विश्वाला नवचैतन्य देणारे निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई या चार भावंडांच्या लीलांचा 'संत ज्ञानेश्वर' चित्रपट पाहताना माऊली तरडगाव मुक्कामी रंगून गेले.



महिला आयोगाच्या चित्ररथाचे बारामती येथे लोकार्पण करताना संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे प्रमुख काशीनाथ महाराज मोरे, विश्वस्त माणिक महाराज मोरे.



बारामती येथे जगदगुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर राज्य महिला आयोगाच्या चित्ररथाची भेट झाली.



जगद्गुरू संत तुकाराम महाराजांवरील संत तुकाराम या चित्रपटाने वारकऱ्यांचे डोळे पाणावले.





दिवसभर धावपळ आणि विश्रांतीच्या क्षणीही विसावा नाही. अशी काही स्थिती आहे आयोगाच्या स्वयंसेवकांची. गावोगावच्या माऊलींपर्यंत कायद्यांची आणि सरकारच्या योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी त्यांची धडपड चालू असते.



'अगो बया... बायकांसाठी इतके कायदे हाईत व्हयं. माहितच नव्हतं. येरवाळी निवांत झाली की वाचून घेईन' वारीतील महिलांची ही प्रतिक्रिया. 'कायदे तुमच्यासाठी' हे पुस्तक हिट ठरले.



'मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलतोय.' मुख्यमंत्र्यांचा हा संदेश जागोजागी दाखविला जातो आणि भाविकांनी तो लक्षपूर्वक ऐकला.





आयोगाच्या चित्ररथामध्ये दररोज एकेका क्षेत्रातील नामवंत सहभागी होत असतात. स्वयंसेवी संस्था, तर कधी राष्ट्रीय समाजसेवेचे विद्यार्थी. ते माऊलींशी संवाद साधतात. अधिकारांची जाणीव करून देतात, कायद्याची माहिती देतात आणि सरकारच्या योजनांबद्दलही जागरूक करतात.





चिंब भिजवणारा पाऊस असो वा उकाड्याचे उनं...
जनजागृती करणारच. आयोगाच्या पुस्तिका सामान्यांतल्या सामान्य माऊलींपर्यंतच पोहोचवणारच...



महिला आयोग म्हणजे फक्त महिलांसाठीच, असे काही पक्के समीकरण नाहीच. किंबहुना स्त्री-पुरूष समानता हेच आयोगाचे अंतिम उद्दिष्ट समानतेचे सर्वोच्च दर्शन घडले वारीमध्ये.



महिला आयोगापासून प्रेरणा घेत सोलापूर पोलिसांनीदेखील निर्भया पथक अभियानातंर्गत प्रबोधन दिंडी काढली. पोलिसांचाही चित्ररथ महिला सक्षमीकरण संकल्पनेवर आधारित होता. याबद्दल पोलिसांनी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचे आभार मानले.





'लीडींग फ्रॉम द फ्रंट'... राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी 'वारी नारी शक्ती'च्या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. चित्ररथांवर थांबून रहाटकर यांनी जनजागृती केली. तसेच, आयोगाने प्रकाशित केलेली कायदे विषयक पुस्तके वितरित केली.




"राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी वारी नारीशक्तीची हा एक आगळावेगळा उपक्रम राबविला आहे. वारी ही महाराष्ट्राची अत्यंत पवित्र अशी परंपरा आहे. भक्तीची शक्ती दाखविणारी परंपरा आहे, आणि या वारीतून आतापर्यंत अनेक समाजोपयोगी संदेश देण्यात आले आहे. स्त्री-भ्रूणहत्या, स्वच्छता अभियान असे अनेक उपक्रम वारीच्या माध्यमातून समाज्याच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्यात आले आहेत. वारीत आम्ही स्वच्छतेचा एक आगळा-वेगळा उपक्रम हाती घेत आहोत. महिला आणि बाल कल्याण खात्याच्या अंतर्गत येणाऱ्या राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून स्वच्छतेची परंपरा आम्ही सुरू करीत आहोत. तसेच अस्मिता योजनेचा रथ या वारीबरोबर महाराष्ट्रभर जाणार आहे. या रथामधून स्वच्छतेचा संदेश दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील ८३ टक्के महिला सॅनिटरी नॅपकिन्स वापरत नाहीत. त्यांच्यासाठी राज्य महिला आयोगाचा हा उपक्रम महत्त्वाचा आहे. त्याला माझ्या शुभेच्छा..!

– **पंकजा मुंडे,** महिला आणि बाल कल्याणमंत्री
('वारी नारी शक्ती'ची उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी पाठविलेला व्हिडिओ संदेश)

गावकारभारणी

# महिला धोरण – समतेचं कोंदण



**दुय्यम जगण्याच्या महिला तुरुंगाला हा सुरुंग अनेक चळवळींनी लावलाच परंतु खरा धमाका होतो तो पहिल्या महिला धोरणाचा! पंचायतीतल्या कारभारणींचा दबदबाही आता गावागावांत जाणवतो.**

**भीम रासकर,**
महिला राजसत्ता आंदोलन, सदस्य, राज्य कौन्सिल
9869259194, bhim.rscd@gmail.com

महिला आरक्षणानंतरचा महिलांच्या राजसत्तेचा प्रवास हा विरोधकांच्या "कल्पक" अभियानांनी खूप गाजला. सुरुवातीला सरपंचपती अभियानातून बाईचा कारभार "फक्त नवराच" कसा देशभर पाहतो, अशी जोरदार आरोळी ठोकली. स्वत: कारभार पाहणारे सरपंचपती व प्रशासक या अभियानाचे सूत्रधार होते, परंतु प्रामुख्याने वर्तमानपत्रे, प्रशासक, पुढारी व समीक्षक मंडळींनी याचा तळ न शोधता महिलांवर दोषारोप लावून खटला स्वत:च निकालात काढला. गावकुसाबाहेर क्वचितच पडलेली महिला गावच्या पारावर कधी नजरही न टाकलेली महिला, वर्तमानपत्रे, टीव्ही यांच्यापासून दूर उभी राहिलेली महिलाही आज स्वत:च अव्वल राजकारणी होते आहे व झाली. आज संसदेत ७८ महिला पोहोचल्या आहेत.

अशा या डरकाळ्या फोडतानांच "रबर स्टँप" अभियानही जन्मले. बायांना कळत नाही. अर्थकारण तर अजिबात जमत नाही, डिजिटल बँक व्यवहार, बँक-चेक व बाईचा काडीचा संबंधच नाही. म्हणून त्यांना नवे रूप मिळाले "रबरस्टँपचे". हवा तिथे ठप्पा मारा, सांगेल तेव्हाच मारा, त्यांच्याकडे आर्थिक अधिकार नको, त्या अडचणीत येतील म्हणून रबरस्टँप महिलांच्या माथी मारला गेला. एकदा एका नवऱ्याने मला बायकोच्या नावाचा स्टँप खिशातून काढून दाखवला. "आपल्याबरोबरच असतो स्टँप, कवा गरज पडंल, सांगता येतंय का?" असे म्हणून त्याने कापडात नीट गुंडाळून रबर स्टँप पुन्हा नीट खिशात ठेवला.

राजकीय विरोधक, अशा नवनव्या शक्कल लढवतांना बाया मात्र हळूहळू पुढे सरकत होत्या. मिळेल तिथून माहितीवर झडप घालीत होत्या. घरात भांडणे करुन प्रशिक्षण घेत होत्या. त्यामुळे हळूहळू हे रबर स्टँप अभियानही अपयशी होऊ लागले. काही बायांनी तर पोलिस तक्रारी केल्या. दिराला, नवऱ्याला, उपसरपंचाला पोलिस स्टेशनात बोलावून माझा "रबर स्टँप" वापरायचा नाही हे ठणकावून सुनावले.

या भानगडीला बाया दाद देत नाहीत हे ध्यानी आल्यावर मग मोहीम आली-महिलांवरील "अविश्वास ठरावांची"! हा शब्दही बऱ्याच जणींनी पहिल्यांदाच ऐकला. गावच्या राजकारणातही अविश्वास ठराव आणता येतो हे बाया राजकारणात आल्यावरच तमाम जनतेलाही कसे समजले? सुमित्रा कान्हातसारख्या आदिवासी तरुणींने हायकोर्टापर्यंत झगडा केला. ती हरली, उपसरपंचाची पंच झाली, पण तिच्या झगड्याने नवीन कायदा जन्माला घातला. दोन तृतीयांश मतांऐवजी महिला लोकप्रतिनिधींवरील अविश्वास प्रस्तावाला तीन चतुर्थांश मते हवीत, असा निर्णय राज्य सरकारने घेतला. जुन्या संकेताने एक तरी महिला बाजूला घेतल्याशिवाय 'अविश्वास' येणे कमी होत गेले. यासोबतच निरंतर महिला प्रतिनिधींचे 'चारित्र्यहनन' अभियानही जोरदारपणे सुरूच होते. ग्रामसेवकाच्या बरोबर स्कूटरवर गेली, लॉजवर जाते, बाहेरगावी फिरते, शिवाय एकटीच जाते...अशा वावड्या सुरू झाल्या. 'संशय का मनी आला – हा मुद्दा आता चर्चेचा नव्हे, गावचर्चेचा झाला. महिलांनी खूप प्रयत्न केले, त्यांना वाईटही वाटले, पण खेळी ध्यानात यायला काही बळी जावे लागले. चारित्र्याच्या प्रश्नावरून 'उच्च दर्जाचे चारित्र्य' असणाऱ्या पुरुषांनी महिलांना राजसत्तेतून खुबीने बाजूला केले. काही ठिकाणी त्यांनी विरोधक महिलांची साथसुद्धा मिळवली. रत्नमालाताई भंडारा जिल्हा परिषदेला हारल्या त्या बदमानीमुळेच, कुटुंबाची

साथ नसती तर त्या राजकारणातूनही बाजूला फेकल्या गेल्या असत्या. महिला व पुरुषांच्या नावानिशी रत्नमालाताईची वैयक्तिक बदनामी करणारे पत्र चार दिवस अगोदर मतदारसंघातील घराघरांत पोहोचले.

या सर्वांची "मेख" बाईला समजायला वेळ लागला नाही. खूप मानसिक त्रास होऊनही त्या आता बदनामीला विशेष भीक घालीत नाहीत. चारित्र्याचा थर्मामीटर फक्त बाईलाच का? असे विचारायला सुरुवात झाल्यावर, बाप्यांच्याही नाड्या थंडावल्या.

आता...इतके करूनही बाई राजकारणातून पळ काढीत नाही म्हटल्यावर, आता 'सरळ हल्ला अभियान' सुरू झाले आहे. काही वर्षांपूर्वी जालन्याच्या जिजाबाई खरातांना तर खुनाच्या आरोपात डांबले. गोंदियाच्या श्रद्धाताई पोलिसांत तक्रारीला गेल्या तर त्यांच्याशी पोलीसच अर्वाच्च वागले. अमरावतीच्या सुनीताताईंच्या डोळ्यांत "तिखट" टाकले. हे हल्ले वाढत्या संख्येने होते. अत्याचार, बलात्कार, हिंसक हल्ले हे नक्कीच शेवटचे हत्यार असणार नाही. राजकारणातले सध्याचे सर्व चालू हातखंडे-फंडे गावापर्यंत पोहोचलेले आहेतच.

बिनविरोध निवडणुकांच्या नावाखाली बायांना पुन्हा नगण्य मानण्याची नवी खेळी सुरू झाली आहे. सरपंचपदाच्या टर्मची वाटणी ही एक-एक, दोन-दोन किंवा अडीच वर्ष तू, अडीच वर्ष मी; अशी सुरू झाली आहे. यात महिला सरपंच शिकणार कधी? काम करणार कशी? तोवर नवीन बाईचा नंबर येतो. "पंचायत पदाचा लिलाव" हाही एक नवा पायंडा गावाला विकासाची भुरळ घालतो. आरक्षणामुळे एक अंधश्रद्धा तयार झाली आहे. पन्नास टक्के ही महिलांची पदे व उरलेली पन्नास टक्के पुरुषांची पदे. लोकमत दैनिकाने अशीच यादी छापली होती. त्याचा महिला राजसत्ता आंदोलनाने निषेध केला, पण ते निषेधपत्र छापून माफी मागण्याची तसदीही लोकमत व्यवस्थापनाने घेतली नाही. महिला समाजालाही हेच बरे वाटायला लागले. तुम्ही इकडे येऊ नका, आम्ही तिकडे येत नाही. 'पन्नास टक्के पुरुषांसाठी व शंभर टक्के महिलांसाठी' हे नवे अभियान लोकांच्या शिक्षणासाठी घ्यावे लागेल. महिला सर्व जागांवर निवडणूक लढवू शकते – हा मानस माध्यमालाही समजायला हवा.

गावाच्या मते, विकास जादूगार म्हणून महिलांनी आता जोरदार काम करायचे आहे. आरक्षण दिले, चला आता जादूगारणीसारखा पटापट गावाचा विकास करून दाखवा, अन्यथा आम्ही नवे आंदोलन सुरू करू.

आम्हालाही पंचायत राज महिला आघाडीची बांधणी करताना सोबतच, ज्योतिबा जागृती अभियानाची चर्चा करणे गरजेचे वाटते. "सावित्री दिसे घरोघरी, ज्योतिबांचा शोध जारी" ही घोषणा आज अनेक संघटनांनी प्रचलित केली. विभागप्रमुख सुनंदा मांदळेंचा पुण्यातून फोन येतो की आम्हाला अमुक एका गावात आपल्या म्हणण्याप्रमाणे एक ज्योतिबा सापडले! हा ज्योतिबा गवसण्याचा सुनंदाताईंना होणारा आनंद, त्यांना स्वत:ला का भावतो? त्यांना व्यक्तिगत आयुष्यात पुरुषांनी लक्ष्य करून त्रास दिला, परंतु त्यांचा ज्योतिबा शोध व त्यातला आनंद, त्या मोकळेपणाने मीटिंगमध्ये जाहीर करतात! ही ज्योतिबा नोंदणी घराघरांत, मनामनांत चालूच आहे. यवतमाळच्या छबूताई चौधरी किंवा लातूरच्या मायाताई सोरटे आपल्या जोडीदारांबद्दल ज्या विश्वासाने बोलायच्या तो विश्वास कार्यकर्त्यांच्या सर्व कुटुंबामधून कमी-अधिक फरकाने, वाढू लागला आहे. महिला धोरणाने हा सुरुंग पेटवला. दुय्यम जगण्याच्या महिला तुरुंगाला हा सुरुंग अनेक चळवळींनी लावलाच परंतु खरा धमाका होतो तो पहिल्या महिला धोरणाचा! पंचायतीतल्या कारभारणींचा दबदबाही आता गावागावांत जाणवतो. बाई आली, पंचायत हलली म्हणजे नेमके काय बदल दिसतात या महिला आरक्षणामुळे?

महिलांमुळे कुठल्या गावप्रश्नांवर भर द्यावा, याचे "अग्रक्रम" बदलले आणि दारूसारखा सामाजिक प्रश्न त्यांनी लोकांसमोर आणला.

या गावकारभारणी आव्हानांचे "रूपांतर" सहजपणे संधीत करतात. उदा. "आमचा गाव-आमचा विकास योजना" उमगली नाही तर त्या अधिकाऱ्यांच्या डोक्यावर जाऊन बसतात.

महिला जबाबदारीची "जाणीव" ठेवतात आणि सृजनशील राहण्याचा प्रयत्न करतात.

पाठबळ तयार करण्याकरिता त्या निरनिराळ्या "आघाड्या" उभारतात. उदा. बचत गट फेडेशन

"लोकशाही" मूल्ये या प्रक्रियेतून चर्चिली जातात व तळापर्यंत मुरतात. उदा. बैठकीमध्येच निर्णय घेणे.

कारभारणींच्या येण्यामुळे ग्रामपंचायतीचे "टाळे" उघडू लागले. तसेच ओल्या-सुक्या पार्ट्या बंद होऊन फक्त चहावर बैठका संपू लागल्या. बैठकीतील दारू, तंबाखू व शिव्यांवर आपोआप बंदी येऊ लागली.

## अशा तऱ्हेने महिला धोरणाच्या पुढाकाराने


संसदीय रचनेतील अगदी तळातील संस्थेचा कारभार करताना, त्यांचे वेगळेपण गावागावांत ठळकपणे उठून दिसते.

"समानता" हा राज्यघनेतील गाभा आता फक्त कागदावरील कल्पना नाहीतर नवनवीन व भिन्न क्षेत्रांत, महिलांच्या प्रभावी येण्याने, समानतेचा पुढील टप्पा गाठला आहे. ही समानता राजसत्तेच्या नेमक्या दिशेनेही वाटचाल करू लागली आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली असलेल्या समाजाने पुरुष आणि स्त्रियांना ठराविक भूमिकांमध्ये बांधून ठेवले होते. पुरुष हा मिळवता, घर चालवणारा, कुटुंबप्रमुख, कर्ता, निर्णय घेणारा, राज्यकर्ता, कायदे बनवणारा, संसाधनांचा मालक, ताबेदार, घर आणि समाजाचा रक्षणकर्ता, साहसी व विजय मिळविणारा असा समज पूर्वी होता. आणि ह्या सगळ्या भूमिका पार पाडण्यासाठी, पुरुषाला एक व्यक्ती म्हणून शासन करण्याचे, निर्णय घेण्याचे, कायदे बनवायचे, शारीरिकदृष्ट्या कणखर होण्याचे, युद्ध कला अवगत करण्याचे, अर्थशास्त्र-राज्यकाभार आणि उद्योगधंदेयांचे ज्ञान अवगत करण्याचे कौशल्य आत्मसात करणे जरुरी असते. तसेच बाई ही आत्मसंयमी पाहिजे. स्त्री ही जतन करणारी, घर सांभाळणारी, अनुयायी, निर्णयाची अंमलबजावणी करणारी, समाजाने घातलेले पायंडे पाळणारी, परंपरा मानणारी, नवीन पिढीला जन्म देणारी, वाढवणारी व नवीन पिढीला चालू सामाजिक परंपरांचा वारसा शिकवणारी असावी. तिच्या वैयक्तिक पातळीवर, तिने विनम्र, शांत सहनशील, प्रेमळ असले पाहिजे, तिचे स्थान पुरुषांपुढे दुय्यम व स्वीकृत पाहिजे. तिने उच्चपदाचा लोभ करता कामा नये. तसेच घरांच्या चारभिंतीत सुख मानले पाहिजे. लिंग आधारीत तयार झालेल्या या भूमिकांनी स्त्री पुरुषाला माणूस म्हणून कैद केले. स्त्री व पुरुष या दोन्ही सीमा ओलांडून स्वत:ची व्यक्ती म्हणून असलेली वैशिष्ट्ये आचरणात आणू शकतात. एक व्यक्ती म्हणून प्रत्येकात दोनही प्रकारातील वैशिष्ट्ये आढळतात. महिलांचा राज्यकारभारासाठी तिच्या क्षमतांचा चांगला फायदा होऊ शकतो, या नव्यासमीकरणांना महिला धोरणाने नवे "कोंदण" तयार केले. प्रसारमाध्यमे, शासन, न्याय व्यवस्था, प्रशासन व नव्याने रुजलेले हे महिला धोरण या सर्वांच्या सुरेख संगमाने "समतेचा रथ वेगेवेगे धावे" असे नवे जग तयार होणार आहे.

ओळख कायद्याची

# महिलांविषयक कौटुंबिक कायदे




**महिलांविषयक कौटुंबिक कायदे विषयक जनजागृतीसाठी राज्य महिला आयोगाने 'विधिलिखित' ही पुस्तक मालिका प्रकाशित केली आहे. त्या मालिकेतील कौटुंबिक हिंसाचार कायद्याची माहिती...**

## कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा, २०13

भारतात आधुनिक काभा रतात आधुनिक काळात नोकरी, व्यवसाय करणाऱ्या महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या स्थितीत कामाच्या ठिकाणी महिलांवर पुरुषांकडून होणारे लैंगिक अत्याचार, शोषण किंवा विनयभंग असे प्रकारही वाढीला लागले आहेत. त्याला आळा घालण्यासाठी २०१३ मध्ये कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा करण्यात आला. भारतात अजूनही अनेक कंपन्या, संस्था, आस्थापनांमध्ये या कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही, असे चित्र आहे. महिलांशी अश्लील संभाषण करणे, खूप शारीरिक लगट करणे, सूचक लैंगिक हावभाव करणे, स्पर्श करणे, सूचक बोलणे, अश्लील छायाचित्र पाठवणे, दाखवणे आदी गोष्टीही या कायद्याद्वारे गुन्हा मानण्यात आल्या आहेत.

या कायद्यातील तरतुदी तपशीलवार पाहू.

### कायद्याचे नाव

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळाविरुद्ध (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) कायदा, २०१३

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्ध त्यांना संरक्षण देण्यासाठी, अशा छळाचा प्रतिबंध करण्यासाठी आणि लैंगिक छळाविरुद्धच्या किंवा त्याच्याशी संबंधित किंवा त्या अनुषंगाने केल्या जाणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठीचा हा कायदा आहे. महिलांचा लैंगिक छळ हा त्यांना राज्य घटनेच्या कलम १४ व १५ नुसार मिळालेला समानतेचा



अधिकार व कलम २१ नुसार मिळालेला सन्मानाने जगण्याचा अधिकार, तसेच त्यांच्या स्वतःच्या मर्जीनुसार काम वा व्यवसाय करण्याचा व त्यासाठी लैंगिक छळापासून मुक्त वातावरण मिळवण्याचा अधिकार या मूलभूत अधिकारांचा भंग आहे. त्याचप्रमाणे लैंगिक छळापासून संरक्षण मिळवण्याच्या आणि सन्मानाने काम करण्याच्या महिलांच्या अधिकाराबाबतच्या; तसेच महिलांबाबत होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावांविरुद्धच्या, आंतरराष्ट्रीय सनदेद्वारा मान्य असलेल्या मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. ही सनद भारताने मान्य केली आहे. त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्ध

महिलांचे संरक्षण करणारी उपाययोजना आखणे केंद्र सरकारवर बंधनकारक बनते.

## कायद्यातील प्रमुख मुद्दे

१. 'महिलांचा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) कायदा, २०१३' नावाचा हा कायदा संपूर्ण भारतात केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून लागू होईल.

**२. काही व्याख्या :**

**बाधित महिला :** कामाच्या ठिकाणच्या संपर्कातील कोणत्याही वयाची, त्या ठिकाणी कामास असलेली किंवा नसलेली, किंवा एखाद्या राहत्या घरात वा वास्तूत कामाला असलेली, कोणत्याही प्रकारच्या लैंगिक छळापासून बाधित महिला. सक्षम शासन : केंद्र सरकार, केंद्रशासित प्रदेश यांच्या मालकीचे वा नियंत्रणात असलेले किंवा त्यांचा थेट किंवा अन्य माध्यमातून निधी मिळत असल्यास केंद्र सरकार; राज्य सरकारच्या मालकीचे वा नियंत्रणात असलेले किंवा त्यांच्याकडून निधी मिळत असल्यास राज्य सरकार; असा निधी मिळत नसल्यास ज्या राज्यात हे कामाचे ठिकाण आहे ते राज्य सरकार.

**घर कामगार :** घरकाम करण्यासाठी रोख किंवा वस्तू रूपात मोबदला देऊन थेट किंवा एखाद्या संस्थेमार्फत तात्पुरत्या वा कायमस्वरूपी, अर्धवेळ अथवा पूर्ण वेळासाठी नेमलेली; परंतु त्या घरमालकाच्या कुटुंबाची सदस्य नसलेली महिला. कर्मचारी : एखाद्या कामाच्या ठिकाणी नियमित, तात्पुरती, नैमित्तिक किंवा रोजंदारीने, थेट अथवा ठेकेदारासहित एखाद्या माध्यमामार्फत मुख्य मालकाला माहिती असताना किंवा नसताना, पगारी अथवा बिनपगारी किंवा स्वयंसेवी पद्धतीने, कामाचे नियम स्पष्ट असताना किंवा अस्पष्ट, सहायक कर्मचारी, कंत्राटी कामगार, कच्ची वा शिकाऊ अथवा कोणत्याही अन्य नावाने नियुक्त केली गेलेली महिला.

मालक अथवा नियोक्ता (एम्प्लॉयर) : कोणत्याही खाते, संस्था, नियंत्रणातील उद्योग, कार्यालय, शाखा अथवा युनिट यांच्याशी संबधित कोणतेही सक्षम सरकार किंवा स्थानिक प्रशासन, वर उल्लेख न केलेल्या कोणत्याही कामाच्या ठिकाणी व्यवस्थापन, निरीक्षण किंवा नियंत्रण करण्याची जबाबदारी असलेली कोणतीही व्यक्ती, मंडळ अथवा कमिटी जी त्या संस्थेसंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्यास व अंमलात आणण्यास जबाबदार असेल. किंवा ती जबाबदारी त्याला ठेक्याने मिळाली असेल. राहत्या घराच्या बाबतीत जी व्यक्ती घर कामगाराला कामाला लावत असेल किंवा तिच्या कामाचा लाभ घेत असेल, मग घर कामगार कितीही संख्येत असोत, कितीही वेळासाठी नियुक्त केलेले असोत किंवा त्यांच्या नियुक्तीचे वा कामाचे स्वरूप कोणतेही असो.

**लैंगिक छळ :** पुढे नमूद केलेली थेट अथवा गर्भितार्थ कृती किंवा वागणूक : शारीरिक संपर्क किंवा त्याबाबत पुढाकार; लैंगिक स्वरूपाची मागणी किंवा विनंती; लैंगिक अर्थाच्या टिप्पणी; अश्लील चित्र किंवा तत्सम गोष्टी दाखवणे; अन्य कोणतीही नको असताना केलेली शारीरिक, तोंडी किंवा शब्दात व्यक्त न केलेली लैंगिक स्वरूपाची कृती.

## कामाचे ठिकाण

अ) सक्षम सरकार, स्थानिक प्रशासन, सार्वजनिक कंपनी, महामंडळ किंवा सहकारी संस्था संचलित कोणतेही खाते, संस्था, उद्योग, कार्यालय, शाखा किंवा युनिट.

आ) खासगी क्षेत्रातील संस्था किंवा कंपनीने चालविलेली संस्था, उद्योग, सोसायटी, विश्वस्त संस्था, स्वयंसेवी संस्था; व्यापारी, व्यावसायिक, कौशल्य प्रशिक्षण, शिक्षण, मनोरंजन, उद्योग, आरोग्य, वित्त आदी क्षेत्रात निर्माण, पुरवठा, विक्री, वितरण किंवा अन्य सेवा देणारी संस्था.

इ) रुग्णालये किंवा शुश्रुषागृह.

ई) खेळांशी संबंधित संस्था, स्टेडियम, वास्तू, स्पर्धा किंवा ठिकाण निवासी असो वा प्रशिक्षण, खेळ किंवा तत्सम कामासाठी वापरात नसलेले असो.

उ) कर्मचारी कामासंदर्भात भेट देत असलेली ठिकाणे किंवा एम्प्लॉयरने पुरवलेली वाहतुकीची साधने.

ऊ) एम्प्लॉयरचे निवासाचे ठिकाण अथवा घर.



असंघटित क्षेत्र : असे कामाचे ठिकाण, ज्याची मालकी वस्तूंचे उत्पादन वा विक्री करणाऱ्या किंवा कोणत्याही प्रकारच्या सेवा पुरवणाऱ्या व्यक्ती किंवा स्वयंरोजगार करणाऱ्या कामगारांकडे असेल आणि ज्या ठिकाणी कामगार लावले गेलेले असतील, त्यांची संख्या दहापेक्षा जास्त नसेल.

## लैंगिक छळाला प्रतिबंध

अ) कोणत्याही महिलेचा लैंगिक छळ होता कामा नये.

आ) पुढील परिस्थितीत लैंगिक स्वरूपाचे वर्तन केले गेल्यास तो लैंगिक छळ समजला जावा.

महिलेला कामाबाबत खास प्राधान्य देण्याचे गर्भित वा स्पष्ट वचन देऊन; तिच्या कामाबाबत नुकसान करण्याची धमकी देऊन; तिच्या कामाच्या सध्याच्या किंवा भविष्यातील पदाबाबत धमकी देऊन; तिच्या कामात हस्तक्षेप करून किंवा तिच्यासाठी असुरक्षित, विरोधी व आक्रमक असे कामाचे वातावरण निर्माण करून; तिला अपमानास्पद वागणूक देऊन; तिचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आणून.

अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना : प्रत्येक मालक वा एम्प्लॉयरने लिखित आदेशानुसार 'अंतर्गत तक्रार कमिटी'चे गठन करावे. अनेक ठिकाणी कामकाज असलेल्या एम्प्लॉयरने आपल्या प्रत्येक विभागामध्ये आणि प्रशासकीय शाखा किंवा कार्यालयांमध्ये त्या स्तरावरील अंतर्गत कमिटी बनविली पाहिजे.

## अंतर्गत कमिटीचे सदस्य

अ) अध्यक्षपदी त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांधून वरिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. त्या ठिकाणी अशी वरिष्ठ महिला उपलब्ध नसल्यास त्याच मालकाच्या अन्य शाखांमधील वरिष्ठ महिलेला अध्यक्षपद देण्यात यावे.

आ) कर्मचाऱ्यांमधून कमीत कमी दोन सदस्य असे नेमण्यात यावेत ज्यांची महिलांच्या प्रश्नांवर बांधिलकी असेल व ज्यांना समाजकार्याचा अनुभव असेल किंवा कायद्याची माहिती असेल.

इ) स्वयंसेवी संस्था किंवा संघटनांमधून एक सदस्य असा घेण्यात यावा, ज्यांची महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असेल; तसेच लैंगिक छळाच्या सर्व मुद्द्यांबाबत जाण असेल. कमिटीमधील किमान ५० टक्के सदस्य महिला असल्या पाहिजेत; अध्यक्ष व कमिटीचे अन्य सदस्य त्यांची नेमणूक झाल्यापासून जास्तीत जास्त तीन वर्षे त्या कमिटीवर काम करतील; स्वयंसेवी संस्थेमधून घेण्यात आलेल्या सदस्याला सुचविण्यात आलेली फी किंवा भत्ता एम्प्लॉयर देईल; अध्यक्ष किंवा एखाद्या सदस्यावर एखादी गुन्हेगारी स्वरूपाची किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरू असल्यास त्या सदस्याला कामिटीवरून काढण्यात येईल व रिक्त जागा नियमाप्रमाणे भरण्यात येईल.



स्थानिक तक्रार कमिटीची स्थापना : सक्षम जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांपैकी एकाची नेमणूक या कायद्यातील कामकाजाची पूर्तता करण्यासाठी जिल्हा अधिकारी म्हणून करतील.

प्रत्येक जिल्हा अधिकारी आपल्या जिल्ह्यासाठीच्या 'स्थानिक तक्रार कमिटी'ची स्थापना करतील. दहापेक्षा कमी कामगार असल्यामुळे अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना होऊ न शकलेल्या सर्व कामाच्या ठिकाणांमधील लैंगिक छळाच्या तक्रारींची नोंद ही स्थानिक तक्रार कमिटी करून घेईल आणि त्यांची सुनावणी घेतील. जिल्हा अधिकारी ग्रामीण व आदिवासी भागात प्रत्येक तालुक्यासाठी एक व शहरी भागात प्रभाग किंवा महापालिका स्तरावर एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करतील, जे त्यांच्याकडे दाखल झालेल्या तक्रारी सात दिवसांच्या आत स्थानिक तक्रार कमिटीकडे पाठवतील. स्थानिक तक्रार कमिटीचे अधिकारक्षेत्र संबंधित जिल्हा असेल.

**स्थानिक तक्रार कमिटीचे स्वरूप, कार्यकाल आणि नियम :** समाजकार्याच्या क्षेत्रामधील व महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असलेल्या प्रथितयश महिला कार्यकर्त्यांमधून अध्यक्षांची नेमणूक करण्यात यावी; एक सदस्य तालुका, महानगरपालिका इत्यादीत काम करणाऱ्या महिलांमधून घ्यावा; दोन सदस्य ज्यातील किमान एक महिला असेल, महिला प्रश्नांशी बांधिलकी असलेल्या स्वयंसेवी संस्थेमधून किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नाची जाण असलेल्यांमधून घेण्यात यावेत. त्यातील एका सदस्याची पार्श्वभूमी कायदे क्षेत्रातील असावी किंवा त्याला कायद्यांची चांगली जाण असावी. किमान एक सदस्य अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास जाती, अल्पसंख्यक समाजातील महिला असावी; जिल्हा समाज कल्याण किंवा महिला बाल विकास अधिकारी या कमिटीचे पदसिद्ध सदस्य असतील; स्थानिक तक्रार कमिटीचे अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ नेमणूक केल्यापासून तीन वर्षांपेक्षा जास्त असणार नाही; बाकी सर्व नियम अंतर्गत कमिटी प्रमाणेच असतील.

केंद्र सरकार फी व भत्ते देण्यासाठी राज्य सरकारकडे लोकसभेने मंजूर केलेला निधी वर्ग करील आणि तो निधी आवश्यकतेनुसार जिल्हा प्रशासनांकडे वर्ग करण्यात येईल.

**तक्रार :** बाधित महिलेने अंतर्गत तक्रार कमिटी व ज्या ठिकाणी अशी कमिटी नसेल तिथे स्थानिक तक्रार कमिटीकडे घटना घडल्याच्या तीन महिन्यांच्या आत किंवा वारंवार लैंगिक छळाच्या घटना घडत असतील तर शेवटची घटना घडल्याच्या तीन महिन्यांच्या आत लेखी तक्रार करू शकेल. तिला लेखी तक्रार देणे शक्य नसल्यास कमिटीचे अधिकारी, अध्यक्ष यांनी तशी व्यवस्था करावी.

बाधित महिलेची शारीरिक किंवा मानसिक अक्षमता किंवा तिचा मृत्यू झालेला असल्यास तिचा कायदेशीर वारस किंवा अन्य नेमलेली व्यक्ती तिच्या वतीने तक्रार दाखल करू शकेल.

**तडजोड :** बाधित महिलेच्या विनंतीवरून तक्रारदार व जाब देणार यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याची कार्यवाही



अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार कमिटी आर्थिक तडजोड न करण्याच्या अटीवर करू शकेल. घडून आलेल्या तडजोडीबाबत अंतर्गत कमिटी नियोक्त्यांना किंवा स्थानिक कमिटी जिल्हा अधिकारी यांना लेखी माहिती देतील. तसेच तडजोडीच्या प्रती बाधित महिला व जाब देणार यांना देण्यात येतील. तडजोड घडून आल्यानंतर पुढील चौकशीची कारवाई थांबविण्यात येईल.

**तक्रारींची चौकशी :** जाब देणारी व्यक्ती कर्मचारी असल्यास व त्यांना कामाचे नियम लागू असल्यास त्या नियमांप्रमाणे पुढील चौकशी सुरू होईल; तसेच ज्यांना असे नियम लागू नाहीत त्यांच्याबाबत विशेषतः तक्रारदार घरकामगार असल्यास भारतीय दंड संहिता कलम ५०९ अथवा अन्य योग्य कलमानुसार तक्रार नोंदविल्यापासून सात दिवसांच्या आत पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदला जाईल. मात्र, त्यासाठी या तक्रारीबाबत कोणतीही तडजोड झालेली नसल्याचा निर्वाळा तक्रारदाराने दिलेला असला पाहिजे. दोन्ही पक्ष कर्मचारी असल्यास दोघांनाही एकमेकांनी दिलेल्या जबाबांची प्रत देण्यात येईल, जेणेकरून त्यांना त्यांची उत्तरे देता येतील. अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार कमिटीला दिवाणी कोर्टाप्रमाणे पुढील अधिकार असतील : कोणत्याही व्यक्तीला समजपत्र पाठवून बोलावून घेणे व त्यांना कमिटीसमोर उपस्थित राहण्यास व शपथेवर जबाब द्यायला बाध्य करणे; आवश्यक ती कागदपत्रे शोधणे किंवा बनविणे; आवश्यक ती अन्य कोणतीही कार्यवाही करणे.

**चौकशी चालू असताना करावयाची कृती :** लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी चालू असताना बाधित महिलेच्या विनंतीवरून संबंधित कमिटी एम्प्लॉयरकडे खालील शिफारस करू शकेल : तक्रारदार महिलेची किंवा जाब देणाऱ्याची अन्य कामाच्या ठिकाणी बदली करावी. किंवा बाधित महिलेला तीन महिन्यांपर्यंतची रजा मंजूर करण्यात यावी. ही रजा तिच्या अन्यथा मिळणाऱ्या रजेच्या व्यतिरिक्त असावी; आवश्यकतेनुसार अन्य कोणताही दिलासा द्यावा. एम्प्लॉयर वरील शिफारशींनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित कमिटीला देईल.

## चौकशीचा अहवाल

१. या कायद्यानुसार केल्या जाणारी चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यामधून निघालेल्या निष्कर्षांचा अहवाल संबंधित तक्रार कमिटी एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकारी यांना चौकशी पूर्ण झाल्याच्या दहा दिवसाच्या आत देईल. त्याची प्रत संबंधित पक्षांना उपलब्ध करून देण्यात येईल.

२. अंतर्गत तक्रार कमिटी अथवा स्थानिक तक्रार कमिटीच्या चौकशीत जाब देणाऱ्या विरुद्धचा आरोप सिद्ध न झाल्यास कमिटी एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना जाब देणाऱ्याविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याची शिफारस करेल.

३. संबंधित तक्रार कमिटीच्या चौकशीत जाब देणाऱ्याविरुद्धचा आरोप सिद्ध झाल्यास कमिटी एम्प्लॉयर अथवा जिल्हा अधिकाऱ्यांकडे पुढील शिफारसी करू शकतात : अ) जाब देणाऱ्याला लागू असलेल्या कामाच्या नियमावलींमधील लैंगिक गैरवर्तणुकीविरुद्ध केल्या जाणाऱ्या शिक्षा त्याला देण्यात याव्यात, आ) बाधित महिलेला किंवा तिच्या वारसाला नुकसान भरपाई म्हणून देण्यात येणारी रक्कम जाब देणाऱ्याच्या पगारातून कपात करण्यात यावी. इ) त्याला नोकरीतून काढणे अथवा गैरहजरीमुळे पगारातून कपात शक्य नसल्यास त्याने ती रक्कम थेट भरावी, असा हुकूम देण्यात यावा. त्याने ती रक्कम न भरल्यास थकबाकी कायदेशीर कारवाई करून वसूल करण्यात यावी. ई) एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकारी त्यांना शिफारशी प्राप्त झाल्याच्या ६० दिवसांच्या आत त्यांची अंमलबजावणी करील.

**खोट्या किंवा खोडसाळपणे केलेल्या तक्रारी व बनावट पुरावे दिल्याबद्दल शिक्षा**

१. संबधित कमिटीला बाधित महिलेने किंवा अन्य व्यक्तीने जाब देणाऱ्याविरुद्ध केलेली तक्रार खोटी आढळून आल्यास अथवा त्यांनी पुरावा म्हणून दिलेली कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळून आल्यास त्या तक्रारदार महिलेविरुद्ध किंवा अन्य तक्रारदाराविरुद्ध कामाच्या नियमावलीनुसार अथवा कमिटीच्या शिफारसीनुसार कारवाई करता येईल. परंतु केवळ आरोप सिद्ध करणे अथवा पुरावे देण्यास अक्षम असणे या गोष्टी शिक्षा देण्यासाठी पुरेशा ठरणार नाहीत. त्याही पुढे जाऊन तिच्यावर कारवाई करण्याआधी तक्रारदार महिलेचा खोडसाळ हेतू तिच्याविरुद्धच्या चौकशीत निर्विवादपणे सिद्ध करावा लागेल.

२. चौकशीच्या दरम्यान एखाद्या साक्षीदाराने खोटी साक्ष अथवा चुकीची माहिती दिल्याचे संबंधित तक्रार कमिटीला आढळून आल्यास त्याला लागू असलेल्या कामाच्या नियमावलीनुसार किंवा कमिटीच्या शिफारसीनुसार त्याच्याविरुद्ध कारवाई करण्याची शिफारस कमिटी एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकाऱ्याकडे करता येईल.

**नुकसानभरपाईची रक्कम निश्चित करणे :** बाधित महिलेला देण्याच्या नुकसानभरपाईची रक्कम ठरवताना पुढील गोष्टी विचारात घ्याव्यात : बाधित महिलेला सहन करावा लागलेला मानसिक शारीरिक त्रास, भावनिक दुःख; लैंगिक छळामुळे सहन करावे लागलेले व्यावसायिक संधींचे नुकसान; बाधित महिलेचा शारीरिक मानसिक उपचारांवर झालेला खर्च; जाब देणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न व आर्थिक स्तर; रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्याने देण्याची क्षमता.

बाधित महिला, तिची तक्रार व त्याबाबतच्या चौकशीची प्रक्रिया या सर्व गोष्टींबाबत गुप्तता : माहितीच्या अधिकाराचा अपवाद वगळता अन्यथा कोणालाही बाधित महिला, तिची तक्रार व चौकशी याबाबत माहिती देता येणार नाही. त्यांना प्रसिद्धी देता येणार नाही. तक्रारदार महिला व साक्षीदार यांचे नाव, पत्ता, ओळख किंवा त्या दिशेने जाण्यास मदत करणारी माहिती गुप्त ठेवावी लागेल.

वरील माहिती गुप्त ठेवण्याच्या कलमाचा भंग करून तिला प्रसिद्धी दिल्यास अशा व्यक्तीविरुद्ध त्या व्यक्तीला लागू असलेल्या कामाच्या नियमावलीनुसार अथवा कमिटीने सुचविल्यानुसार कारवाई करता येईल.

**अपील :** कमिटीच्या शिफारशी वा अंमलबजावणी याबाबत

कामाच्या नियमावलीनुसारचे कोर्ट अथवा लवादाकडे (ट्रायब्युनल) व अशी नियमावली लागू नसल्यास सक्षम त्या कोर्टात शिफारशी पाठवल्याच्या ९० दिवसांच्या आत अपील करता येईल.

**मालक अथवा एम्प्लॉयरचे कर्तव्य :** प्रत्येक एम्प्लॉयरने, अ) कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे. यात कामाच्या ठिकाणी संपर्कात येणाऱ्या व्यक्तींपासूनची सुरक्षा समाविष्ट आहे. आ) लैंगिक छळाविरुद्ध होणाऱ्या कारवाईबाबत, तसेच अंतर्गत तक्रार कामितीबाबत सर्वांना दिसेल अशा ठिकाणी माहिती प्रदर्शित करावी. इ) या कायद्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी कार्यशाळा, जनजागृतीचे कार्यक्रम नियमितपणे घेऊन आपल्या कर्मचाऱ्यांना कायदा, त्यातील तरतुदी, अंतर्गत तक्रार कमिटी व त्याचे सदस्य यांची माहिती द्यावी. ई) अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार कमिटीला कामकाज करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्यावीत. उ) अंतर्गत किंवा स्थानिक कामिटीसमोर जाब देणाऱ्या व्यक्तीला व साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी कमिटीला सहकार्य करावे. ऊ) तक्रारीच्या चौकशीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे व माहिती कमिटीला उपलब्ध करून द्यावी. ए) बाधित महिला भारतीय दंड संहिता किंवा त्या वेळी लागू असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याची मदत घेऊ इच्छित असल्यास तिला सर्व साह्य द्यावे, ऐ) लैंगिक छळ करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहिता किंवा त्या वेळी लागू असलेल्या कायद्याच्या अंतर्गत कारवाई सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा. ती व्यक्ती कर्मचारी असल्यास त्याची लैंगिक छळाची कृती ही गैरवर्तणूक आहे, असे मानून त्याच्या विरुद्ध कामाच्या नियमावलीत गैरवर्तणुकीबाबत असलेली कारवाई सुरू करावी. ती व्यक्ती कर्मचारी नसल्यास अन्य कायद्यांच्या आधारे कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अंतर्गत कमिटी वेळेत कारवाई करीत आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवावे.

जिल्हा अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये : जिल्हा अधिकारी स्थानिक कमिटी वेळेत अहवाल सादर करीत आहे काय यावर लक्ष ठेवतील; तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने लोकांमध्ये लैंगिक छळाबाबतचा कायदा व महिलांचे अधिकार याबाबत जागृती घडवून आणतील.

कमिटीने द्यावयाचा वार्षिक अहवाल : अंतर्गत कमिटी व स्थानिक कमिटी दर वर्षी आपल्या कामकाजाचा अहवाल तयार करील आणि अनुक्रमे एम्प्लॉयर किंवा जिल्हा अधिकाऱ्यांना देईल. या अहवालांच्या आधारे जिल्हा अधिकारी एक संक्षिप्त अहवाल राज्य सरकारला देतील.

एम्प्लॉयरने कंपनीच्या वार्षिक अहवालात द्यावयाची माहिती : एम्प्लॉयर आपल्या कंपनीच्या वार्षिक अहवालात कंपनीत नोंद झालेल्या तक्रारी, आणि त्यावरील कार्यवाही याबाबतच्या अहवालाचा समावेश करील. असा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला जात नसेल, तर हा अहवाल जिल्हा अधिकाऱ्याला सादर करील.

**सक्षम शासनाचे कर्तव्य :** सक्षम शासन कायद्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवील आणि नोंदलेल्या तक्रारी व त्यांच्यावरील कार्यवाहीची माहिती व आकडेवारी गोळा करील.

**सरकारने द्यावयाची प्रसिद्धी :** सक्षम शासन उपलब्ध निधी व साधनांच्या मर्यादेत आवश्यक ती माहिती, शिक्षण, संपर्क आणि प्रशिक्षणाची साधने विकसित करील; तसेच महिलांना कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून सुरक्षा देण्यासाठीच्या या कायद्यातील तरतुदींबाबत जनजागृतीचे व लोकांची त्याबाबत समज वाढविण्यासाठीचे कार्यक्रम करील. तसेच स्थानिक तक्रार कमिटीच्या सदस्यांची समज तयार करणे व त्यांची प्रशिक्षण करणे यासाठीचे कार्यक्रम करील.

**माहिती मागवण्याचा व रेकॉर्ड तपासण्याचा अधिकार**

१. सक्षम शासन जनहित व महिला कर्मचाऱ्यांचे कामाच्या ठिकाणचे हित लक्षात घेऊन लिखित आदेशांद्वारे : आवश्यकता भासल्यास कोणत्याही एम्प्लॉयर अथवा जिल्हा अधिकाऱ्यांना बोलावून लैंगिक छळाबाबतची माहिती मागवून घेईल; तसेच लैंगिक छळाच्या संदर्भात एखादे रेकॉर्ड किंवा कामाचे ठिकाण तपासण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करील, जो ठराविक कालावधीत आपला तपासणीबाबतचा अहवाल सादर करील.

२. प्रत्येक नियोक्ता किंवा जिल्हा अधिकारी व तपासणी अधिकाऱ्याच्या मागणीनुसार संबंधित विषयाची माहिती, रेकॉर्ड व त्यांच्या ताब्यातील अन्य कागदपत्रे त्याच्यासमोर सादर करतील.

**कायद्यातील तरतुदींचे पालन न केल्याबद्दल दंड :** १. एम्प्लॉयरने अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना; तक्रारींबाबत कार्यवाही; हा कायदा व त्याचे नियम यांचे पालन न केल्यास एम्प्लॉयरला ५० हजार रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. २. एखाद्या एम्प्लॉयरला वरील कोणत्याही कारणाने दंड झालेला असेल व त्याने पुन्हा त्याचे उल्लंघन केल्यास त्याला, पहिल्या वेळी झालेल्या दंडाच्या दुप्पट दंड होईल किंवा त्याचा व्यवसाय करण्याचा परवाना रद्द केला जाऊ शकतो.

**कोर्टाची दखल :** या कायद्याच्या तरतुदींमध्ये कोणतेही कोर्ट दखल घेणार नाही; मेट्रोपॉलिटन किंवा ज्युडिशियल कोर्टाच्या खालील कोर्ट या कायद्याच्या अंतर्गत कारवाई करणार नाही; या कायद्यातील प्रत्येक गुन्हा अदखलपात्र असेल. या कायद्यातील तरतुदी अन्य कायद्यांचा भंग करणार नाहीत; पण त्यांना पूरक असू शकतील.

**सक्षम सरकारचा नियम बनविण्याचा अधिकार :** केंद्र सरकार या कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यासाठी खालील मुद्द्यांवर आवश्यक नियम बनवू शकेल : सदस्यांना देण्याची फी व भत्ते; सदस्यांची नेमणूक; अध्यक्ष व सदस्यांना देण्याची फी व भत्ते; तक्रार करू शकणारी व्यक्ती; चौकशीची पद्धत; चौकशी करण्याचा अधिकार; दिलासा देण्यासंबंधीची शिफारस; कायद्यातील विविध कलमान्वये करावयाच्या कारवाईची पद्धत; कार्यशाळा, कर्मचाऱ्यांसाठी जनजागृतीचे, सदस्यांसाठी समज वाढविण्याचे कार्यक्रम आयोजित करण्याची पद्धत आणि कामिट्यांनी वार्षिक अहवाल देण्याची पद्धत.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार :** या कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यात कोणतीही अडचण किंवा अवरोध निर्माण झाल्यास त्यावर मात करण्यासाठी दोन वर्षांच्या आत त्या तरतुदींना पूरक आदेश काढेल व ते लोकसभेसमोर मांडेल.






# मेरी कोमचे लक्ष्य ऑलिंपिक पदकाचे

**मुष्टियुद्धाच्या क्षेत्रात सुपर मॉम म्हणून ओळखली जाणारी भारताची महान खेळाडू मेरी कोम कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यावर आहे. टोकियो ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक मिळवून कारकिर्दीची सांगता करण्याची तिची जिद्द आहे. त्यासाठी मेरी सध्या जोरदार सराव करीत आहे.**



अमित मधुकर डोंगरे
amitdongre10@gmail.com

जागतिक मुष्टियुद्ध क्षेत्रात कायमच पुरुष खेळाडूंची मक्तेदारी राहिली आहे. गेल्या दशकातील महिला खेळाडूंची कामगिरी पाहिली तर, असे जाणवते की महिला खेळाडूदेखील दबदबा प्रस्थापित करीत आहेत. अशाच काही खेळाडूंमध्ये भारताच्या एम. सी. मेरी कोम हिचे नाव अगदी अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

मेरीने लहान वयापासून या खेळात आपला ठसा उमटविण्यास सुरुवात केली. अनेक आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांत यश मिळविल्यानंतर आता कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यावर जपानमध्ये होणाऱ्या ऑलिंपिकमध्ये पदक मिळविण्याचे तिचे लक्ष्य असून टोकियो ऑलिंपिकनंतर ती निवृत्ती जाहीर करणार आहे. निवृत्तीनंतर स्वतःच्या अकादमीत लक्ष घालणार आहे.

आपल्या देशात महिलांना लहानपणापासून काही ठरावीक खेळांमध्येच खेळायची परवानगी असायची, या जुनाट मानसिकतेत बदल झाल्याचे दिसते आहे. कुस्ती, मुष्टियुद्ध अशा खेळांमध्येदेखील मुली आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी होऊन यशस्वी होताना दिसत आहेत. पुरुषांची मक्तेदारी असलेल्या खेळांमध्ये मेरी कोमसारख्या खेळाडू सहभागी होत राहिल्या व यशदेखील मिळवू लागल्या तेव्हा या पुरुषप्रधान खेळांतील महिला खेळाडूंकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि महिला




खेळाडूंवर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव सुरू झाला. मेरीने सातत्याने सरस कामगिरी करत आपल्या देशाचे नाव उंचावले. इतकेच नव्हे तर तिने आपला दबदबादेखील प्रस्थापित केला. इतकी वर्षे खेळल्यानंतर आता निवृत्तीकडे झुकलेल्या मेरीचे जपान ऑलिंपिकमधील पदकाचे अंतिम ध्येय आहे.

मेरीच्या कामगिरीवर व एकूणच आयुष्यावर 'अनब्रेकेबल' हे आत्मचरित्र नुकतेच प्रकाशित झाले आहे व त्यात मेरीने आपल्या आयुष्यातील घटनांची माहिती दिली आहे. तिचे हे आत्मचरित्र नवोदित खेळाडूंसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. भारतासारख्या पुरुषप्रधान देशात पहिल्यापासून घरातूनच पाठिंबा मिळालेली मेरी पहिलीच मुष्टियुद्ध खेळाडू ठरली आहे. आई-वडिलांखेरीज इतर नातेवाइकांनीही सुरुवातीला मेरीला विरोध केला, परंतु त्याची पर्वा न करता मेरीने वाटचाल सुरू केली. ती मुष्टियुद्ध खेळते. त्यात चेहऱ्याला मार लागण्याची भीती असते. मेरीच्या चेहऱ्याला दुखापत होऊन ती विद्रूप दिसू लागली तर तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागेल, अशी भीती तिचे नातेवाईक दाखवित होते, मात्र मेरीने त्यांना आपल्या खेळाने दमदार उत्तर दिले व देशपातळीवरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील उत्तुंग भरारी घेतली. तिचे आत्मचरित्र मंजुल प्रकाशनाने प्रकाशित केले असून, विदुला टोकेकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झाले आहे. ते नवोदित खेळाडूंना निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. हे आत्मचरित्र केवळ इंग्रजी व मराठीतूनच नव्हे तर भारतातील अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. २०१२च्या लंडन ऑलिंपिकमध्ये मेरीने ब्राँझ पदक पटकावले आहे. मेरीने आंतरराष्ट्रीय पातळीवर पाच सुवर्णपदके मिळविली आहेत. अशी कामगिरी करणारी मेरी देशाची एकमेव खेळाडू आहे. हाच तिच्या आजवरच्या वाटचालीचा खूप मोठा टप्पा समजला जातो. मणिपूरमधील कंगथेई या गावातून आलेली मेरी आज जागतिक पातळीवर अनेक पहिला मुष्टियुद्ध खेळाडूंसाठी प्रेरणास्थान ठरते आहे. २००३मध्ये अर्जुन, २००६ मध्ये पद्मश्री, २००९ मध्ये राजीव गांधी खेलरत्न आणि २०१३ मध्ये पद्मभूषण असे देशातील मानाचे पुरस्कार तिने मिळविले. तसे आजवर तिला अनेक पुरस्कार जरी मिळालेले असले तरी पद्मभूषण पुरस्कार मिळविणारी मेरी देशाची एकमेव महिला खेळाडू ठरली आहे. तिने आजवर अनेक कठीण प्रसंगांचा जरी सामना केला असला तरीही आत्मचरित्रात मात्र तिने कोणावरही टीका केलेली नाही. कोणी कसेही वागले तरी आपण आपल्या खेळावरच लक्ष केंद्रित करायचे हे तत्त्व तिने कायम पाळले आहे, म्हणूनच इतर खेळाडूंपेक्षा ती वेगळी ठरते. मेरी कोमवर अन्याय झाला, तेव्हाही तिने कधी त्याबाबत जाहीररीत्या प्रतिक्रिया दिली नाही. टीकाकारांना खेळातील यशानेच उत्तर दिले आहे. मेरीने कारकिर्दीच्या मध्यावर असतानाच विवाह करण्याचा निर्णय घेतला तेव्हा अनेकांना आश्चर्य वाटले. तिचा खेळ संपला असेही अनेकांनी म्हटले, मात्र मेरीने विवाहच काय पण आई झाल्यानंतर लगेचच मैदानात उतरण्याचे जाहीर करत पहिल्याच स्पर्धेत यशस्वी कामगिरी करीत आपण अजूनही देशासाठी पूर्वीप्रमाणेच यश मिळवू शकतो हे दाखवून दिले. कुरुंग बोलनेर या आपल्या मित्राबरोबरच मेरीने विवाह केला, कुरुंग देखील एक फुटबॉलपटू होता व तो सध्या नवोदित खेळाडूंना प्रशिक्षण देतो. आई झाल्यानंतर म्हणजेच सुपरमॉम बनल्यानंतर तर मेरीचा खेळ व कामगिरी आणखीनच बहरली. आई बनल्यानंतर मेरीने २०१५, २०१६ व २०१७ या तिन्ही वर्षी राष्ट्रीय पातळीवर पदके मिळविली व टीकाकारांची तोंडे आपल्या कामगिरीने बंद केली.

भारताचा महान खेळाडू डिंको सिंग याचा खेळ पाहून मेरीला या खेळात कारकीर्द घडविण्याची प्रेरणा मिळाली. २०१४ मध्ये मेरीच्या वाटचालीवर चित्रपट बनला व त्याला चाहत्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला, तेव्हाच तिच्या महानतेची साक्ष जागतिक क्रीडाविश्वाला झाली. अभिनेत्री

प्रियांका चोप्रा हिने त्यात मेरीची भूमिका केली होती व तिला त्यासाठी प्रत्यक्ष मेरीने मुष्टियुद्धाचे धडे दिले होते. या चित्रपटाच्या यशामुळे जितके पैसे प्रियांकाला मिळाले, तितके मेरीला प्रत्यक्ष खेळूनही मिळाले नाहीत. पण याबाबत मेरीने कधीही तक्रार केली नाही, उलट तिने आणखी यश मिळवित आपल्यात अद्याप खूप खेळ बाकी असल्याचे दाखवून दिले. या चित्रपटामुळे मेरीची ओळख देशात व परदेशांत, तळागाळांत पोहोचली. ती केवळ एक खेळाडू नसून, राज्यसभेची खासदारही बनली आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी तसेच प्रगतीसाठी तिने राज्यसभेत अनेकदा आवाज उठवला. तिच्यामुळे केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने विविध योजना सुरू केल्या व आज याच योजनांचा लाभ नवोदित खेळाडूंना मिळत आहे. ती जेव्हा खासदार बनली तेव्हाही तिने आपल्या खेळाकडे काणाडोळा केला नाही तर त्याचवेळी झालेल्या कॉन्फेडरेशन करंडकात सुवर्ण पदक मिळविले. एक मार्च १९८३ साली जन्मलेल्या मेरीच्या नावावर जागतिक हौशी मुष्टियुद्ध स्पर्धेच्या सलग सहा विजेतेपदांची नोंद आहे. अशी कामगिरी करणारी मेरी देशाची एकमेव खेळाडू आहे. 'मॅग्निफिसंट मेरी' या नावाने ओळखली जाणारी मेरी आज जपानमध्ये होत असलेल्या ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्यासाठी सज्ज होत आहे. लाइट फ्लायवेट गटात मेरी खेळते व याच गटात आता तिला ऑलिंपिक पदकाचे लक्ष्य आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा तसेच राष्ट्रकुल स्पर्धेतही सुवर्ण मिळविणारी मेरी गेली दोन दशके मुष्टियुद्धात आपला दबदबा टिकवून आहे. आजवरच्या वाटचालीत मेरीने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत १९ सुवर्ण, २ रौप्य व ४ ब्राँझ पदके पटकावली आहेत. राष्ट्रीय स्तरावर तिने पदकांची रास ओतली असून, ती जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी तर राष्ट्रीय स्तरावरही अव्वल स्थानी राहीली आहे. २०१४ साली मोदी सरकार स्थापन झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या शिफारसीनुसार ती राज्यसभेची खासदार बनली व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी सातत्याने संपर्कात राहून तिने देशातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी खूप मोलाचे योगदान दिले. मेरीला आजवर शेकडो पुरस्कार मिळाले असूनही, तिचे पाय जमिनीवर घट्ट आहेत. तिने आपली अकादमी सुरू केल्यानंतर या खेळाची आवड असलेल्या मात्र घरची परिस्थिती हलाखीची असलेल्या खेळाडूंना विनामोबदला प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. जी मेहनत आपल्याला करावी लागली ती पुढच्या पिढीतील खेळाडूंना करावी लागू नये यासाठीच तिने ही अकादमी अत्यंत कमी शुल्क घेऊन सुरू केली व आजही ही अकादमी देशातील एक यशस्वी अकादमी म्हणून प्रसिद्ध आहे.

मेरीला जेव्हा २००५ मध्ये जुळी मुले झाली व त्यानंतर २०१३ मध्ये आणखी एक मूल झाले तेव्हा आता मेरीचा खेळ संपला अशी टीका करणाऱ्यांना मेरीने मैदानात यशस्वी पुनरागमन करून व यश मिळवून चोख उत्तर दिले. प्राणी हक्कांसाठी लढणाऱ्या 'पेटा' या संस्थेशीही ती जोडली गेली आहे. तिच्या सामाजिक क्षेत्रातील कामांमुळे तिच्याबद्दलचा आदर आणखीनच वाढला. सर्कसमध्ये हत्तींच्या वापर करण्याविरोधात तिने आवाज उठवला. मुक्या प्राणांच्या गळचेपीविरुद्ध तिने सातत्याने आवाज उठविला. तिच्या प्रयत्नांमुळे हत्तीच काय इतरही अनेक प्राण्यांच्या गळचेपीवर बंधने लादली गेली. मेरीच्या कारकिर्दीची आता अखेरची इनिंग सुरू झाली असुन तीने जपानमध्ये येत्या वर्षी होत असलेल्या ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. त्यापूर्वी तिला या स्पर्धेच्या पात्रता फेरीतही खेळावे लागणार आहे. सध्या मेरी त्याचसाठी देश-परदेशांतील विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत असून, त्यासाठी ती कठोर मेहनत देखील घेत आहे. तिची तंदुरुस्ती पूर्वीप्रमाणेच असून, आता तिला सरावातील सातत्य व विविध स्पर्धांतील सहभाग यातूनच ऑलिंपिक पात्रता मिळवावी लागणार आहे. मेरीने पाहिलेले स्वप्न जपानमध्ये पूर्ण झाल्यास तिच्याबरोबरच देशातील सव्वाशे कोटी जनतेतूनच भविष्यातील अनेक मेरी कोम पुढे येतील. मेरीप्रमाणेच देशाचे नाव जागतिक पातळीवर उंचावतील. एक मेरी यशस्वी ठरली तर ईतर अनेक मुलींनी तीच्याकडुन प्रेरणा घेत या खेळाचे धडे गिरवायला सुरुवात केली. ज्या प्रकारे सचिन तेंडूलकरकडुन प्रेरणा घेत अनेक खेळाडू क्रिकेटकडे वळले त्याच प्रकारे मेरीमुळे देखील अनेकजण मुष्टियुद्धाकडे वळले आहेत. आता लहानपणापासून खडतर मेहनत घेत जे यश मेरीने मिळविले त्या शिरपेचात ऑलिंपिक पदकाच्या गवसणीने आणखी एक मानाचा तुरा खोवला जावा अशीच अपेक्षा तिचे चाहते व्यक्त करत आहेत. बघू या घोडा मैदान जवळच आहे.

सचिन, पी. टी. उषा, धनराज पिल्ले, सुमा शिरूर, साक्षी मलिक, विराट कोहली, विश्वनाथन आनंद, सायना नेहवाल, पंकज अडवाणी हे आणि असे विविध खेळातील महान खेळाडू घडले त्यातच मेरीचेही नाव अग्रक्रमाने घेतले जाते, हेच तिच्यातील अद्वितीय प्रतिभेचे लक्षण आहे.



# जनधन खात्यांतील ठेवी एक लाख कोटींच्या वर

## बँकांमध्ये ३६ कोटी खाती; महिलांच्या सहभागाने अभूतपूर्व यश

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पाच वर्षांपूर्वी सुरू केलेल्या प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत उघडण्यात आलेल्या बँक खात्यांतील ठेवींचा आकडा आता १ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला आहे.

वित्त मंत्रालयाने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, सध्या देशातील विविध बँकांत ३६.०६ कोटी जनधन खाती आहेत. ३ जुलै रोजी या खात्यांवर १,००,४९५.९४ कोटी रुपये जमा होते. या योजनेतील लाभधारकांच्या खात्यांतील ठेवी सातत्याने वाढत आहेत. ६ जून रोजी या खात्यांवरील जमा रक्कम ९९,६४९.८४ कोटी रुपये होती. त्या आधी आठवडाभरापूर्वी ती ९९,२३२.७१ कोटी रुपये होती.

२८ ऑगस्ट, २०१४ रोजी जनधन योजना सुरू करण्यात आली होती. देशातील गरीब जनतेला बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही खाती उघडण्यात आली होती. आता या योजनेत उघडण्यात आलेल्या खात्यावर रुपे डेबिट कार्ड आणि ओव्हरड्राफ्टची सुविधा देण्यात आली आहे.

### शून्य शिलकीची खाती १४ टक्के

सुरुवातीच्या काळात शून्य शिल्लक असलेल्या जनधन खात्यांची संख्या मोठी होती, नंतर ती कमी होत गेली. वित्त मंत्रालयाने राज्यसभेत अलीकडेच दिलेल्या माहितीनुसार, मार्च, २०१८ मध्ये शून्य शिल्लक असलेल्या जनधन खात्यांची संख्या ५.१० कोटी (एकूण खात्याच्या १६.२२ टक्के) होती.

मार्च २०१९ मध्ये ती ५.०७ कोटी (एकूण खात्याच्या १४.३७ टक्के) झाली. २८.४४ कोटी खातेधारकांना रुपे डेबिट कार्ड देण्यात आले. या खात्यांत किमान शिल्लक ठेवण्याचे बंधन नाही. या योजनेचे यश लक्षात घेऊन सरकारने २८ ऑगस्ट, २०१८ नंतर उघडण्यात आलेल्या नव्या खात्यांसाठी देय असलेल्या विम्याची रक्कम १ लाखांवरून २ लाख केली आहे. ओव्हरड्राफ्टची मर्यादा दुप्पट करून १० हजार करण्यात आली आहे.

## गरिबांच्या सक्षमीकरणाबरोबरच देशाच्या विकासातही बनली साथीदार

## जन-धन योजना

जन-धन खात्यामधील रक्कम 1 लाख कोटी रुपयांवर

खात्यातील एकूण रक्कम
**१,००,४५९.९५** कोटी रुपये

एकूण खातेधारक
**३६.०६ कोटी**

महिला खातेधारक
**१९.१९ कोटी**

रुपे डेबिट कार्ड धारक लाभार्थी
**२८.४५ कोटी**

ग्रामीण आणि निमशहरी भागातील बँक शाखांमध्ये उघडलेली खाती
**३६.०६ कोटी**

PRADHAN MANTRI JAN-DHAN YOJANA
MERA KHATA BHAGYA VIDHATA

*आकडेवारी ३ जुलै २०१९ पर्यंतची
स्रोत-भारत सरकार

# अल्पसंख्याक महिलांसाठी २८०० बचतगट स्थापन करणार

## कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई :** अल्पसंख्याक समुदायातील महिलांसाठी स्वयंसहाय्यता बचतगटांची स्थापना करुन त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याच्या योजनेस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या योजनेंतर्गत औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती विभागातील निवडक १४ जिल्ह्यांमध्ये २८०० बचतगटांची स्थापना करण्यात येणार आहे.

शासनाकडून मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्राच्या जलद विकासासाठी राबवावयाच्या उपाययोजनांचा विशेष कार्यक्रम-२०१८ जाहीर करण्यात आला होता. याअंतर्गत अल्पसंख्याक समुदायातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत त्यांचे बचतगट निर्माण करुन त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण व रोजगार संधी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. त्यानुसार अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, हिंगोली, जालना, उस्मानाबाद, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली अशा १४ जिल्ह्यांत प्रत्येकी २०० याप्रमाणे एकूण २८०० बचतगट स्थापन केले जाणार आहेत. यात मुस्लीम, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारसी व ज्यू या अल्पसंख्याक समाजातील गरीब व गरजू महिलांचा समावेश असेल. तसेच बचतगटात दारिद्र्य रेषेखालील महिलांचा प्राथम्याने समावेश असणार आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बचतगटांची स्थापना करण्यासह त्यांना मार्गदर्शन आणि क्षमता बांधणी देखील करण्यात येणार आहे. या योजनेचा अंमलबजावणी कालावधी दोन वर्षाचा असणार आहे.

या योजनेंतर्गत नव्याने स्थापित बचतगटांसह नांदेड, कारंजा (जि. वाशिम), परभणी, औरंगाबाद, नागपूर या पाच शहरांमध्ये महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत स्थापित आणि कार्यरत असलेल्या अल्पसंख्याक महिला बचतगटांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत बाजारातील कौशल्याच्या गरजेनुसार हे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणाचा कालावधी कमीत कमी तीन महिन्यांचा असून बचतगटांना प्रशिक्षणाबरोबरच स्वंयरोजगारासाठी पुढील सहा महिने सहाय्य केले जाणार आहे. या योजनेसाठी ६ कोटी २३ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.



# ‘पोक्सो’ अंतर्गत आता फाशीही

**नवी दिल्ली :** बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आलेला पॉक्सो कायदा आता आणखी कडक करण्यात आला आहे. या कायद्यातील सुधारणांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून त्यानुसार आता बालकांचे लैंगिक शोषण करणाऱ्या गुन्हेगारांना मृत्युदंडापर्यंतची शिक्षा ठोठावण्यात येणार आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून पॉक्सो कायद्यातील बदलालाही मंजुरी देण्यात आली आहे. देशात बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने त्याला आळा घालण्यासाठी बाललैंगिक शोषण केल्यास मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्याच्या पॉक्सो कायद्यातील दुरुस्तीस मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय कायदा मंत्री रविशंकर प्रसाद यांनी त्याबाबतची माहिती दिली. मुलांना शारीरिक, मानसिक, सामाजिक संरक्षण देऊन त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा हे उद्दिष्ट ठेवून हा कायदा तयार करण्यात आला आहे. याशिवाय पीडित मुलांना न्यायालयातील सुनावणीच्या काळात व आवश्यकतेसुनार सर्व टप्प्यात संरक्षण पुरविण्यात येते.

पोस्को कायद्यातील कलम २, ४, ५, ६, ९, १४, १५, ३४, ४२ आणि ४५ या कलमात सुधारणा करण्यात आली आहे.

कलम ४, ५ आणि ६ मधील सुधारणांमुळे गुन्हेगाराला फाशीची शिक्षा होणार आहे. कलम १४ आणि १५ बाललैंगिक साहित्य बनवणे, विकणे आणि वितरित करणाऱ्यावर कायद्याचा बडगा उचलला जाईल.

## काय आहे पॉक्सो कायदा

- बालकांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठी २०१२ मध्ये पॉक्सो कायदा
- १८ वर्षांखालील मुलांना लैंगिक अत्याचारापासून संरक्षण देण्याचा हेतू
- या खटल्याची सुनावणी १ वर्षात संपवणे बंधनकारक
- कमीतकमी १० वर्ष तर जास्तीजास्त जन्मठेपेची शिक्षेची तरतूद होती, आता ही तरतूद वाढवून मृत्युदंडाची करण्यात आली
- लहान मुलाच्या लैंगिक शोषणाची चित्रफीत बनवल्यास त्यासाठी वेगळ्या शिक्षेची तरतूद



# स्त्री-पुरुष गुणोत्तरात वाढ

## देशातील प्रमाण दरहजारी ९३१ वर

**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांत मुलींच्या घटत्या जन्मदरामुळे आणि परिणामी विषम होत चाललेल्या स्त्री-पुरुष गुणोत्तरामुळे समाजात चिंतेचे वातावरण पसरले होते. मात्र, या निराशाजनक परिस्थितीत एक आशादायक बातमी समोर आली आहे. देशातील स्त्री-पुरुष गुणोत्तर म्हणजे दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांची संख्या यात वाढ झाली आहे. सन २०१५-१६ च्या तुलनेत ही वाढ असून, यंदाच्या मार्चमध्ये नोंदविण्यात आलेल्या आकडेवारीनुसार देशातील स्त्री-पुरुष गुणोत्तर ९३१ आहे. याचा अर्थ दर एक हजार पुरुषांमागे देशात ९३१ स्त्रिया आहेत.

केरळ आणि छत्तीसगडमध्ये हेच प्रमाण ९५९ आहे. त्याखालोखाल मिझोरामचा क्रमांक आहे. तिथे हे गुणोत्तर ९५८ आहे. मिझोरामपाठोपाठ गोव्याचा तिसरा क्रमांक आहे. तिथे हे गुणोत्तर ९५४ आहे. केंद्र सरकारने राबविलेल्या बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानाचे हे यश असल्याचे मानले जात आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये या योजनेचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.

सन २०१५-१६मध्ये देशात पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण ९२६ होते. २०१७-१८मध्ये ९२९ वर पोहोचले. यंदाच्या मार्चमध्ये हेच प्रमाण ९३१ झाले आहे. संसदेत विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाच्या उत्तरादरम्यान केंद्रीय महिला आणि बाल कल्याण मंत्रालयाच्या वतीने वरील आकडेवारी देण्यात आली. देशातील २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश मिळून २५ ठिकाणी स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनेत वाढल्याचे दिसून आले आहे. सर्वाधिक संख्या अंदमान आणि निकोबार येथे वाढली आहे. या ठिकाणी पूर्वी स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनते दर हजारी ८९७ होती. आता तीच संख्या ९४८ झाली आहे.

त्या खालोखाल सिक्कीमचा क्रमांक लागतो. तेथील प्रमाण ९२८ वरून वाढून ९४८ झाले आहे. तेलंगणमध्येही मुलींचे प्रमाण वाढले आहे. तेथील गुणोत्तर ९२५वरून ९४३वर पोहोचले आहे.

देशातील १२ राज्यांमध्ये मात्र अद्यापही चिंताजनक स्थिती कायम असून, या ठिकाणी मुलींचे प्रमाण घटले आहे. त्यात अग्रस्थानी अरुणाचल प्रदेश आहे. तेथे महिलांचे प्रमाण ९५६ वरून ९१४ पर्यंत खाली घसरले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये प्रमाण ९५८ वरून ९४३ पर्यंत खाली आले आहे. तमिळनाडूमध्ये ९४७ वरून ९३६, महाराष्ट्रात ९४० वरून ९३० अशी महिलांच्या दरहजारी प्रमाणात घट नोंदविण्यात आली आहे. केरळ आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये मात्र मुलींचे प्रमाण वाढले आहे.

२०१५-१६ आणि २०१८-१९ मधील आकडेवारीची तुलना केल्यास देशातील २५ राज्यांमध्ये मुलींचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. मुलींचे प्रमाण वाढलेल्या राज्यांमध्ये लक्षद्वीप, गोवा, नागालँड, उत्तराखंड, हरियाणा या राज्यांचा समावेश आहे. जानेवारी २०१५पासून या राज्यांमध्ये बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियान राबविण्यात येत आहे.

# २० हजार महिलांनी मृत नदी जिवंत केली

**वेल्लोर :** संपूर्ण देश जल संकटाला तोंड देत असताना अनेक गावांतील नागरिकांनी स्वतःच दुष्काळाविरोधात कंबर कसली आहे. तमिळनाडूमधील वेल्लोर शहराजवळील एका गावातील महिलांनी एकत्र येऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न केल्यामुळे गावातील नदीला जीवनदान मिळाले आहे.

तमिळनाडूमधील २४ गावे दुष्काळात कोरडी पडली. वेल्लोर शहराजवळून वाहणारीनागनदीगेल्या अनेक शतकांपासून येथील नागरिकांसाठी पाण्याचा मोठा स्त्रोत होती. मात्र गेल्या १५ वर्षांपासून नदीला पाणी नाहीए. यंदा पडलेल्या दुष्काळामुळे गावाजवळील अन्य स्त्रोतही बंद झाल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागली. नदीचे जलाशय कोरडे पडल्याने हातावर पोट असणारे मजूर आपले कुटुंब इथेच ठेवून दुसऱ्या गावांमध्ये आणि शहरात गेले. घरी असलेल्या त्यांच्या कुटुंबीयांना घेऊन 'आर्ट ऑफ लिव्हिंग' या संस्थेने नागनदी पुनरुज्जीवन प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पाअंतर्गत २० हजार महिलांनी ३,५०० विहीरींचे पुर्नरभरण केले आणि सोबतच अनेक ठिकाणी पावसाचे पाणी अडवण्यासाठी बांध घातले. चार वर्ष चाललेल्या या प्रयत्नांना अखेर यश आलं आणि २०१८च्या मान्सूनमध्ये नदीला पाणी लागलं.

'नदी तेव्हाच खळखळून वाहू लागते; जेव्हा भूजलाची पातळी पुरेशी असते. त्यामुळे फक्त नदीत पाणी कसं येईल यापेक्षा जमिनीच्या आत पाणी कसं मुरेल याकडे लक्ष दिलं पाहिजे. पावसाच्या वाहून जाणाऱ्या पाण्याचा वेग मंदावून मातीत मुरवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत', असे 'आर्ट ऑफ लिव्हिंग' या संस्थेचे कार्यकर्ते चंद्रशेखर कुप्पन यांनी सांगितलं. यावर्षी पाऊस सुरू झाल्यावर नदी पूर्वीसारखीच खळखळून वाहू लागेल, असा दावा त्यांनी केला आहे.

# महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

**राज्य महिला आयोगाची ‘सुहिता’ हेल्पलाइन**
७४७७७२२४२४

**महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे**
०२०-२६०५०१९१ (www.punepolice.gov.in)

**पुणे नियंत्रण कक्ष**
०२०-२६१२६२९६

**पुणे गुन्हे शाखा कक्ष**
०२०-२६११२२२२, २६२०८२९५

**पुणे महिला साह्य कक्ष**
०२०-२६२०८३४१

**हेल्पलाइन**
१८१

**पुणे सखी हेल्पलाइन**
०२०-२४४८४५३५

**स्त्री सन्मान हेल्पलाइन**
०२२-८८८८८०९३०६

**आय लव्ह मुंबई आणि सकाळ**
८८८८८०९३०६

**नवी दिल्ली हेल्पलाइन**
१००/१८१



// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२-२६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com


प्रति / TO


RNI No. MAHMAR49593



If undelivered, pls return to,
महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई,
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग, कलानगर,
वांद्रे (पू.),
मुंबई ४०००५१